रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १५ ◆ अंक ३२९
www.ramprahar.com
# राम प्रहर
शनिवार, १७ जून २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग
वाढत्या चोऱ्या रोखण्यासाठी पोलिसांची विशेष पथके/३
साथीचे आजार नियंत्रणासाठी आरोग्य विभागाकडून दक्षता/६
एमपीएलमध्ये 'पुणेरी बाप्पा'चा विजयी श्रीगणेशा/८

## रेशन कार्ड 'आधार'शी लिंक करण्यास मुदतवाढ




**नवी दिल्ली** : केंद्र सरकारने शिधापत्रिकाधारकांसाठी मोठा निर्णय घेतला असून रेशन कार्डशी आधार लिंक करण्याची तारीख सरकारने पुन्हा एकदा वाढवली आहे. आधी लिंक करण्याची शेवटची तारीख ३० जून होती, पण आता सरकारने ती तीन महिन्यांसाठी वाढवली आहे. म्हणजेच आता ३० सप्टेंबरपर्यंत 'आधार'शी रेशन कार्ड लिंक करता येणार आहे. अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्रालयाने या संदर्भात माहिती. मंत्रालयाकडून मिळालेल्या माहितीनुसार ३० सप्टेंबर ही आधारशी रेशन लिंक करण्याची अंतिम तारीख आहे. एकापेक्षा जास्त शिधापत्रिका असण्याचा प्रकार टाळण्यासाठी सरकारने ते लिंक करण्याची सुविधा सुरू केली आहे. रेशन कार्ड आणि आधार कार्ड एकमेकांशी लिंक केल्यानंतर ग्राहकांना यासंबंधी होणारे त्रास टाळता येऊ शकतात.

# हाच का तो कर्नाटक पॅटर्न?

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचा उद्धव ठाकरेंसह 'मविआ'ला सवाल

**धाराशिव : प्रतिनिधी**

कर्नाटक राज्यात सत्तांतर होताच तेथील काँग्रेस सरकारने याआधी भाजप सरकारने घेतलेले निर्णय फिरवण्यास सुरुवात केल्याचे पहायला मिळत आहे. कर्नाटकमध्ये भाजप सरकारने आणलेला धर्मांतरविरोधी काँग्रेसने कायदा रद्द केला तसेच स्वातंत्र्यवीर सावरकरांचा धडाही अभ्यासक्रमातून वगळला. यावरून भाजप आक्रमक झाला असून महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि महाविकास आघाडीवर हल्लाबोल केला आहे. ते शुक्रवारी (दि. १६) धाराशिव येथे बोलत होते.





उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, माझा महाविकास आघाडीला सवाल आहे की, ते महाराष्ट्रात कर्नाटक पॅटर्न आणणार म्हणत आहेत तो हाच आहे का? आता उद्धव ठाकरे यांची प्रतिक्रिया काय आहे? त्यांनी त्यांची भूमिका स्पष्ट करावी. ते ज्यांच्या मांडीला मांडी लावून बसले ते स्वातंत्र्यवीर सावरकरांचे नाव पुसायला निघाले आहेत. धर्मांतरणाला समर्थन देत आहेत. आता उद्धव ठाकरेंचे मत काय हे त्यांनी सांगावे. यावरून उद्धव ठाकरेंनी सत्तेसाठी ही तडजोड केली हे स्पष्ट होते. मला असे वाटते की, असे निर्णय घेऊन त्यांना कुणाचेही नाव जनतेच्या मानसपटलावरून पुसता येणार नाही.

स्वातंत्र्यवीर सावरकरांना अभ्यासक्रमातून वगळू शकता, मात्र ते लोकांच्या मनातून सावरकर-हेडगेवार यांना काढू शकत नाहीत. ते लोकांच्या मनातून एकही स्वातंत्र्यसंग्रामी काढू शकत नाही. काँग्रेसचे सरकार आल्यानंतर यापेक्षा वेगळे काहीच अपेक्षित नाही. केवळ अल्पसंख्याकांचे लांगुलचालन करण्यासाठी कर्नाटकचे सरकार निर्णय घेत आहे, अशी टीका उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी केली.

लोक आपापल्या शुभेच्छा व्यक्त करतात, पण मी ज्या ठिकाणी आहे तिथे पूर्णपणे समाधानी आहे तसेच महाराष्ट्राची सेवा करायला मिळणे हीदेखील अत्यंत महत्त्वाची बाब आहे आणि देशामध्ये इतके सक्षम नेतृत्व आहे की, पुढची २० वर्षे पंतप्रधान नरेंद्र मोदींनीच देशाच नेतृत्व करावे, असे उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

धाराशिवमधील रेल्वे प्रश्नावर बोलताना उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, रेल्वेचा संघर्ष खूप वर्षांपासून चालू होता, तो थांबणार असून लवकरच रेल्वेदेखील सुरू होईल. त्यांनी पुढे सांगितले की, कृष्णा मराठवाडा प्रकल्पामुळे २४ हजार हेक्टर जमीन ओलिताखाली येणार असून त्यासाठी निधीही दिला आहे.

### ...तर लवकरच मंत्रिमंडळ विस्तार

उपमुख्यमंत्री झाल्यानंतर प्रथमच इथे दर्शनासाठी आलो. आई तुळजाभवानीने शक्ती दिली, तर लवकरच मंत्रिमंडळ विस्तार होईल, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. लोकसभा निवडणुकीसंदर्भात बोलताना ते म्हणाले, प्रत्येक पक्षाच्या कार्यकर्त्याला आपण निवडणूक लढवावी असे वाटत असते. त्यात काहीच वावगे नाही, पण कोणी कुठली जागा लढवायची याबद्दल सर्व वरिष्ठ बसून चर्चा करतील. मग निर्णय घेतला जाईल.

## बिपरजॉय चक्रीवादळाने गुजरातमध्ये मोठे नुकसान

**गांधीनगर : वृत्तसंस्था**

बिपरजॉय चक्रीवादळाने गुजरातच्या किनारपट्टी भागाला गुरुवारी मोठा तडाखा दिला. या चक्रीवादळाने मोठे नुकसाने केले असल्याची माहिती गुजरातचे मदत व पुनर्वसन आयुक्त अलोक पांडे यांनी दिली.

बिपरजॉय चक्रीवादळाने गुजरातमध्ये थैमान घातले. या चक्रीवादळात इलेक्ट्रिक पोल्स आणि मोठ्या प्रमाणावर झाडे पडली. यामुळे अनेक रस्ते बंद झाले. ३४ लोक जखमी झाले असून मोठ्या प्रमाणावर पशूधनाचे नुकसान झाले आहे. यामध्ये तब्बल ९४ प्राण्यांचा मृत्यू झाला आहे, असे अलोक पांडे यांनी सांगितले.

चक्रीवादळामुळे गुजरातमध्ये सध्या जोरदार पाऊस सुरु असून अनेक शहरांना पुराच्या पाण्यामुळे नदीचे स्वरूप आले आहे, तर भुज येथील भवानीपर गावातील एक छोटा पूल पावसाच्या पाण्यामुळे आलेल्या पुरात वाहून गेला आहे. यामुळे गावाचा संपर्क तुटला आहे. याचा व्हिडीओदेखील समोर आला आहे. चक्रीवादळानंतर आता युद्धपातळीवर शोध व मदतकार्य सुरू झाले आहे.



**पनवेल : रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या (आठवले गट) पनवेल महानगरपालिका जिल्हाध्यक्षपदी प्रभाकर कांबळे यांची नियुक्ती झाली आहे. याबद्दल त्यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची शुक्रवारी भेट घेतली. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी प्रभाकर कांबळे यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी आरपीआयचे कामोठे शहर अध्यक्ष मंगेश धीवार, सरचिटणीस रवींद्र कांबळे, गौतम पाटेकर, सुरेंद्र सोरटे आदी उपस्थित होते.**

## नवाब मलिकांचा लवकरच फैसला

**मुंबई : प्रतिनिधी**

वैद्यकीय कारणास्तव दाखल करण्यात आलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी नेते नवाब मलिक यांच्या जामीन अर्जावर मुंबई उच्च न्यायालयाने आदेश राखून ठेवला आहे. या प्रकरणी शुक्रवारी (दि. १६) न्यायालयात सुनावणी झाली. दोन्ही बाजूंनी युक्तिवाद झाला. पुढील आठवड्यात मलिकांच्या जामीन अर्जावर निकाल येण्याची शक्यता आहे.

माफिया डॉन दाऊद इब्राहिम व त्याच्या साथीदारांच्या कारवायांशी संबंधित मनी लॉण्डरिंग प्रकरणात ईडीने फेब्रुवारी २०२२मध्ये माजी मंत्री मलिक यांना अटक केली होती. ईडीने उच्च न्यायालयात नवाब मलिक यांना किडनीच्या तीव्र आजाराने ग्रस्त असल्याच्या कारणावरून मागितलेल्या जामिनाला विरोध केला.

## भाजपची पनवेल विधानसभा टिफिन बैठक उत्साहात

# राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांचा पक्षप्रवेश



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

देशामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सरकार सत्तेवर येऊन नुकतीच नऊ वर्षे पूर्ण झाली. त्यानिमित्ताने भाजपच्या वतीने महाजनसंपर्क अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत भाजप पनवेल विधानसभेची टिफिन बैठक पक्षाचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी (दि. १६) झाली. या वेळी कर्जत तालुक्यातील दहिवली ग्रामपंचायतीमधील राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी विकासाचे 'कमळ' हाती घेतले.




पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या लोकाभिमुख, जलद व पारदर्शक कारभारामुळे देशाचा विकास व प्रगती होत आहे. पंतप्रधान मोदींचे देशाप्रति कार्य, विविध योजना जनतेपर्यंत पोहचविण्याच्या उद्देशाने महाजनसंपर्क अभियान राबविण्यात येत आहे. या अंतर्गत पनवेल तालुका व शहर भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली टिफिन बैठक झाली. या बैठकीत विविध विषयांवर चर्चा करण्यात आली.

या बैठकीस भाजपचे ज्येष्ठ नेते व कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील, तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, जिल्हा विस्तारक अविनाश कोळी, सरचिटणीस नितीन पाटील, विनोद साबळे, दीपक बेहेरे, राजेश मपारा, पनवेलच्या माजी महापौर कविता चौतमोल, माजी उपमहापौर सीताताई पाटील, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, ओबीसी सेल जिल्हाध्यक्ष राजेश गायकर, भाजप जिल्हा उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे, प्रल्हाद केणी, फ्रेंड्स ऑफ बीजेपीचे उत्तर रायगड जिल्हा संयोजक नितीन कांदळगावकर, खालापूर तालुका सरचिटणीस प्रवीण मोरे, उरण तालुका सरचिटणीस कैलास भोईर, माजी नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ, मनोहर म्हात्रे, डॉ. अरुणकुमार भगत, विजय चिपळेकर, प्रकाश बिनेदार, संतोष भोईर, माजी नगरसेविका राजश्री वावेकर, ॲड. वृषाली वाघमारे, मोनिका महानवर, रूचिता लोंढे, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, सुनील घरत, ज्येष्ठ नेते सी. सी. भगत, के. सी. पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, माजी पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील, खारघर शहर अध्यक्ष ब्रिजेश पटेल, कळंबोली शहर अध्यक्ष रविनाथ पाटील, पळस्पे विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे, युवा मोर्चा उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष मयुरेश नेतकर, सांस्कृतिक सेल जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, महिला मोर्चा पनवेल शहर अध्यक्ष वर्षा नाईक, भाजप शहर सरचिटणीस अमरिश मोकल, तोंडरे माजी सरपंच राम पाटील, दुंदरेचे माजी उपसरपंच रमेश पाटील, राकेश गायकवाड, सय्यद अकबर, सतीश पाटील, अशोक मोटे, अशोक साळुंखे, बिना गोगरी, विद्या तामखडे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. (पान २ वर..)

### मोदी @ ९

मोदी सरकारच्या काळात झालेल्या विकासकामांची माहिती देण्यासाठी मोदी @ ९ कार्यक्रमांतर्गत महाजनसंपर्क अभियानाच्या अनुषंगाने विकास तीर्थ, डॉक्टर, शिक्षक, वकील, इंजिनिअर यांचे प्रबुद्ध नागरी संमेलन, प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष मोदी सरकारला सोशल मीडियाच्या माध्यमातून पाठिंबा देणाऱ्यांचे सोशल मीडिया इन्फ्ल्यूएन्सर संमेलन, विशाल रॅली, जाहीर सभा, योग दिन, ज्येष्ठ कार्यकर्ता संमेलन, लाभार्थी संमेलन, व्यापारी संमेलन, व्हर्च्युअल रॅली, घरोघरी संपर्क अभियान, संयुक्त मोर्चा संमेलन असे विविध कार्यक्रम होणार आहेत.




## निवडक

### जम्मू-काश्मीरमध्ये पाच दहशतवाद्यांना कंठस्नान

**कुपवाडा** : जम्मू-काश्मीरमधील कुपवाडात भारतीय जवान आणि दहशतवाद्यांमध्ये सीमारेषेवर धुमश्चक्री झाली. यामध्ये जवानांनी पाच दहशतवाद्यांना कंठस्नान घातले. ठार झालेले दहशतवादी हे जम्मू-काश्मीर गझनवी फोर्स या दहशतवादी संघटनेचे सदस्य होते. ते गुरुवारी रात्री कुपवाडातील जुमागंड येथून भारतीय हद्दीत घुसखोरी करताना त्यांना यमसदनी धाडण्यात आले.

### सेट परीक्षेचा २८ जूनला जाहीर होणार निकाल

**पुणे** : महाराष्ट्र आणि गोवा राज्यातील प्राध्यापक पात्रता (सेट) परीक्षेचा निकाल २८ जून रोजी घोषित करण्यात येणार आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वतीने संकेतस्थळावर यासंबंधीची सूचना देण्यात आली आहे. मार्च महिन्यातील २६ तारखेला राज्यभरातील विविध केंद्रावर ही परीक्षा घेण्यात आली होती.

## पंतप्रधान मोदींकडून योगाचा व्हीएफएक्स व्हिडीओ शेअर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या पार्श्वभूमीवर देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी योग दिनाच्या संदर्भातील व्हीएफएक्सद्वारे तयार केलेला एक व्हिडीओ शेअर केला आहे. शरीर आणि मन निरोगी आणि आनंदी राहण्यासाठी योगसाधना महत्त्वाचे काम करते, असा संदेश या व्हिडिओतून दिला आहे.



**योगाचा शरीर आणि मन दोन्हीसाठी खूप फायदा होतो. योगा हे सामर्थ्य, लवचिकता आणि शांतता वाढवते. चला, योगाला आपल्या जीवनाचा एक भाग बनवूया आणि शरीर, मनाने निरोगी आणि आनंदी राहूया.**
**-नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे अमेरिका दौऱ्यावर असतानाच २१ जून रोजी न्यूयॉर्क येथील संयुक्त राष्ट्र संघाच्या मुख्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिनाचे नेतृत्व करणार आहेत. या समारंभात संयुक्त राष्ट्र महासभेचे अध्यक्ष साबा कोरोसीही सहभागी होणार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत नवव्या आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या उत्सवात सहभागी होण्यासाठी मी उत्साहित आहे, असे कोरोसी यांनी म्हटले आहे.

साबा कोरोसी यांच्या ट्वीटला पंतप्रधान मोदींनी प्रतिसाद दिला आहे. संयुक्त राष्ट्राच्या मुख्यालयात होणाऱ्या आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या समारंभात तुम्हाला भेटण्यासाठी मी उत्सुक आहे.

# पनवेलमधील बेलपाड्यात रस्ता काँक्रीटीकरण

## भाजप नेते अरुणशेठ भगत यांच्या हस्ते भूमिपूजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल आणि उरण तालुक्यात भाजपच्या माध्यमातून तसेच भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांच्या नेतृत्वाखाली विकासाची अनेक कामे मार्गी लागत असून नागरिकांना विविध सुविधांचा लाभ मिळत आहे. त्याच अनुषंगाने पनवेल तालुक्यातील बेलपाडा गावात आमदार महेश बालदी यांच्या प्रयत्नांमुळे रस्त्याच्या काँक्रीटीकरणासाठी जिल्हा वार्षिक नियोजन समितीतून २० लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. या कामाचे भूमिपूजन भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते शुक्रवारी (दि. १६) झाले.




माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली गव्हाण, उलवे नोड परिसरात विकासाची कामे होत आहेत. अशाच प्रकारे बेलपाडा येथे रस्ता साकारणार आहे. त्याच्या भूमिपूजन समारंभास भाजपचे बेलपाडा अध्यक्ष गणेश पाटील, ज्येष्ठ नागरिक अशोक घरत, गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, भाजप गव्हाण पं. स.अध्यक्ष जयवंत देशमुख, वाहतूक सेलचे हेमंत ठाकूर, मयूर ठाकूर, दत्ता गुरूजी, गिरीश म्हात्रे, विकास पाटील, सतीश म्हात्रे, संतोष म्हात्रे, मनोहर म्हात्रे, अंकुश पाटील, संतोष पाटील, किशोर ठाकूर, विजय पाटील, कबीर म्हात्रे, प्रल्हाद म्हात्रे, मधुकर म्हात्रे, चंद्रकांत म्हात्रे, ग्रामपंचायत सदस्य पंकज पाटील, बेलपाडा ग्रामसुधारणा मंडळाचे सचिव अतिश पाटील, मदन कडू, गजानन म्हात्रे, राम कोळी, इतर पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

# शेवटच्या लाभार्थ्यापर्यंत योजनांचा लाभ देणार

## मुख्यमंत्र्यांचे प्रतिपादन; पुण्यात 'शासन आपल्या दारी'

**पुणे : प्रतिनिधी**

शासन आपल्या दारी' या उपक्रमाच्या माध्यमातून जास्तीत जास्त लोकांपर्यंत शासकीय योजना पोहचविण्यासाठी शासन व प्रशासन प्रयत्नशील असून शेवटच्या नागरिकाला विविध योजनांचा लाभ मिळेपर्यंत हे अभियान सुरू राहील, अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील 'शासन आपल्या दारी' उपक्रमांतर्गत मुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते शासकीय योजना व विविध सेवांच्या लाभाचे प्रातिनिधीक स्वरुपात वाटप करण्यात आले. या वेळी ते बोलत होते. कार्यक्रमाला खासदार श्रीरंग बारणे, सर्वश्री आमदार उमा खापरे, महेश लांडगे, अश्विनी जगताप, माजी राज्यमंत्री बाळा भेगडे, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह, जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आयुक्त राहुल महिवाल, पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, 'शासन आपल्या दारी' अभियानाच्या माध्यमातून प्रशासकीय यंत्रणा गतीमान करण्यात आली आहे. १ एप्रिलपासून या अभियानाची सुरुवात करण्यात आली. पुणे जिल्ह्यात २ लाख ८६ हजार २७८ लाभार्थ्यांना लाभाचे वाटप करण्यात आले. आतापर्यंत राज्यात ३५ लाख नागरिकांपर्यंत शासन पोहोचले आहे. १०४ शिबिराच्या माध्यमातून २८६ कोटी रुपयांचा लाभ नागरिकांना देण्यात आला आहे. या अभियानामुळे कोणीही लाभार्थी लाभापासून वंचित राहणार नाही.

मंत्रिमंडळाच्या माध्यमातून अनेक जनहिताचे निर्णय मंत्रीमंडळाच्या माध्यमातून सर्वसामान्य जनतेच्या हिताचे अनेक निर्णय घेण्यात आले आहेत. शेतकरी, कष्टकरी, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग बांधव, महिला भगिनींसाठी महत्वाचे निर्णय घेतले. ज्येष्ठ नागरिकांसाठी एसटी प्रवास मोफत व महिलांसाठी प्रवास शुल्कात ५० टक्के सवलत देण्यात आली आहे. शासनाच्या निर्णयांचा सर्वसामान्य जनतेला लाभ होत आहे.

'नमो शेतकरी महासन्मान निधी' योजनेनुसार राज्य शासनही ६ हजार रुपये भर घालणार येणार असल्याने १२ हजार इतका वार्षिक लाभ पात्र शेतकरी कुटुंबांना मिळणार आहे. राज्यातील १८ हजार कोटी रुपयांच्या २९ सिंचन प्रकल्पांना मान्यता देण्यात आली, त्यामुळे ६ ते ७ लाख हेक्टर जमीन ओलिताखाली येणार आहे. अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई म्हणून एनडीआरएफच्या निकषांच्या दुप्पट निधी देण्याचा आणि सततच्या पावसाने झालेल्या नुकसानीची भरपाई देता यावी यासाठी १ हजार ५०० कोटी रुपयांचा निधी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

पिंपरी चिंचवड परिसर विकासासाठी महत्वाचे निर्णय पिंपरी चिंचवड विकासासाठी अनेक निर्णय घेतले. २०१८ते २०२३ पर्यंतचे विकास आणि बांधकामाचे अतिरिक्त विकास शुल्क १०० टक्के माफ करण्याचा निर्णय. एप्रिल २०२३ पासून क्षेत्रनिहाय तपासून आकारणीचा निर्णय घेण्यात आला आहे. मोशी येथे छत्रपती संभाजी महाराजांच्या स्मारकासाठी अडीच एकर जागा देण्याचा निर्णय घेतला आहे. पिंपरी चिंचवड हद्दीतील अनधिकृत बांधकामासाठीचा ४६० कोटी रुपयांचा शास्तीकर माफ करण्यात आला आहे. पिंपरी चिंचवड नवनगर प्राधिकरणाच्या भूसंपादनामुळे बाधित झालेल्या भूमिपूत्रांचा प्रश्न सोडविण्यात येईल, असेही ते म्हणाले.

जिल्ह्याच्या विकासाला गती पालखी मार्ग आणि पुणे-मिरज रेल्वे मार्गाच्या भूसंपादनाची कामे पूर्ण करण्यात आली आहेत. चांदणी चौकातील कामही पूर्ण होत आहे. जेजुरी तीर्थक्षेत्र विकास आणि वढू बुद्रुक येथे संभाजी महाराज स्मारक काम लवकरच सुरू करण्यात येईल. यशवंतराव चव्हाण स्मारकासाठी ५ कोटी रुपये देण्यात येतील. पुण्यातील नद्यांमधील पाणी निर्मळ राहावे यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या माध्यमातून जलशुद्धीकरणासाठी निधी देण्यात आला आहे, असे मुख्यमंत्री म्हणाले.

'लेक लाडकी लखपती' ही योजना महिला व मुलींच्या विकासासाठी सुरु करण्यात आली आहे. महिलांना सक्षम करण्यासाठी महिला बचत गटाच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात येत आहे. प्रशासनाने बचत गटाच्या उत्पादनांना बाजार उपलब्ध करून देण्याचा आणि फिरता निधी उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात येईल. राज्यात २ कोटी पेक्षा अधिक महिलांना शासनाच्या योजनांचा लाभ देण्याचा प्रयत्न आहे. संजय गांधी निराधार योजनेसाठी उत्पन्नाच्या दाखल्याची मुदत ५ वर्ष करण्यात येईल, असेही श्री.शिंदे यांनी सांगितले.

राज्याच्या सर्वांगीण विकासाला चालना लोकांचे जीवन सुखी, आनंदी करणे आणि त्यांच्या आयुष्यात अनुकूल बदल घडवून आणणे हे शासनाचे उद्दीष्ट आहे. म्हणूनच सर्वासामान्य जनतेला केंद्रस्थानी घेवून त्यांच्या हिताचे निर्णय घेण्यात येत आहेत. राज्यात पायाभूत सुविधांचे अनेक मोठे प्रकल्प सुरू करण्यात आले आहेत. परकीय गुंतवणुकीत महाराष्ट्र प्रथम स्थानावर असून गेल्या सुमारे ११ महिन्यात १ लाख १८ हजार कोटींची गुंतवणूक महाराष्ट्रात आणल्याचेही त्यांनी या वेळी सांगितले.



**■ *विविध योजनांचा एकाच ठिकाणी लाभ***

*खासदार श्रीरंग बारणे म्हणाले की, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शासनातर्फे जनतेच्या समस्या सोडविण्याचे प्रयत्न होत आहेत. नागरिकांना शासन आपल्या दारी अभियानांतर्गत एकाच ठिकाणी विविध योजनांचा लाभ देण्यात येत आहेत, तर आमदार अश्विनी जगताप यांनीही या वेळी विचार व्यक्त केले. चिंचवड विधानसभा मतदारसंघ क्षेत्रात संजय गांधी निराधार योजनेत चांगले काम झाल्याचे त्यांनी सांगितले.*

# मुस्लीम तुष्टीकरणाची काँग्रेसची भूमिका उद्धव ठाकरेंना मान्य आहे का?

## भाजप मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांचा सवाल



**मुंबई : प्रतिनिधी**

कर्नाटकातील काँग्रेस सरकारच्या शालेय पाठ्यपुस्तकांमधून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक डॉ. हेडगेवार आणि स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्यावरील धडे वगळणे, धर्मांतरविरोधी कायदा रद्द करणे या निर्णयाबाबत उद्धव ठाकरे व संजय राऊत काही बोलणार आहेत का? मुस्लीम तुष्टीकरणाचे काँग्रेसचे हे धोरण स्वत:ला हिंदुत्ववादी म्हणवणाऱ्या उद्धव ठाकरे यांना मान्य आहे का, असा परखड सवाल भाजपचे मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी शुक्रवारी (दि. १६) केला. भाजप प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

या वेळी भाजप उत्तर मोर्चाचे प्रभारी कृपाशंकर सिंह, माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन, प्रवक्ते अभिषेक मिश्रा उपस्थित होते.

भाजपचे मुख्य प्रवक्ते उपाध्ये म्हणाले की, कर्नाटकच्या काँग्रेस सरकारने हिजाबबंदी रद्द करण्यापाठोपाठ धर्मांतरबंदी कायदा रद्द करण्याची तयारी सुरू केली आहे. डॉ. हेडगेवार-सावरकरांचे धडे शालेय पाठ्यपुस्तकातून वगळण्याचा निर्णय हा काँग्रेसच्या कूपमंडूक विचारांचे दर्शन घडवणारा आहे. गांधी-नेहरू घराण्यापुरता मर्यादित इतिहास माहिती असलेल्या सावरकरद्वेषी काँग्रेससोबत महाराष्ट्रात मांडीला मांडी लावून बसणारे उद्धव ठाकरे राष्ट्रपुरुषांच्या अपमानाविरोधात ब्र ही काढत नाहीत यावरून त्यांची लाचारी स्पष्ट होते. प्रखर राष्ट्रभक्त डॉ. हेडगेवार यांना भ्याड व खोटे स्वातंत्र्यसैनिक संबोधून अपमान करणाऱ्या काँग्रेसच्या भूमिकेशी आपण सहमत आहोत का हेही ठाकरे-राऊत यांनी स्पष्ट करावे.

स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या राष्ट्रकार्याचा इंदिरा गांधी यांनीदेखील गौरव केला होता, मात्र आता काँग्रेसने इंदिरा गांधींचा वारसा सोडून दिला असून राहुल गांधींच्या सावरकर द्वेषी राजकारणावर जनाधार प्राप्त करण्याचा काँग्रेसचा केविलवाणा प्रयत्न सुरू आहे, असे उपाध्ये म्हणाले.

देशातील जनता समान नागरी कायद्यास अनुकूल असताना कर्नाटक सरकार मात्र धर्मांतरबंदी कायदा रद्द करण्याची पावले टाकून काळाचे चक्र उलटे फिरवू पाहात आहे. सक्तीच्या धर्मांतरातून सामाजिक सलोखा बिघडतो हे अनेक घटनांतून सिद्ध झालेले असताना हा कायदा रद्द करून राज्यात धार्मिक विद्वेष पसरविण्याचा व त्याचा राजकीय फायदा उठविण्याचा कर्नाटकातील काँग्रेस सरकारचा कुटिल डाव आहे, असा आरोपही उपाध्ये यांनी या वेळी केला.

# आषाढीसाठी विदर्भातून तीन विशेष रेल्वेगाड्या सोडणार

**नागपूर :** केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या मागणीनंतर रेल्वे मंत्रालयाने पंढरपूरच्या आषाढी एकादशीच्या यात्रेसाठी विदर्भातून तीन विशेष गाड्या सुरू करण्याचा निर्णय घेतला. या निर्णयामुळे पंढरपूरला जाणाऱ्या विदर्भातील लाखो भाविकांची मोठी सोय झाली आहे. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील भाविक आषाढी एकादशीच्या यात्रेसाठी पंढरपूरला जातात. यामध्ये विदर्भातील नागपूरसह भंडारा, गोंदिया, गडचिरोली, वर्धा, चंद्रपूर, अमरावती, अकोला येथील भाविकांचाही मोठ्या प्रमाणात समावेश असतो. नागपूर, अमरावती व खामगाव अशा तीन ठिकाणांहून या गाड्या सुटणार आहेत. त्या विदर्भातील बहुतांश जिल्ह्यांमधून जातील.

# पनवेलमध्ये २४ जूनला महारोजगार मेळावा

**अलिबाग : प्रतिनिधी**

प्रकल्पग्रस्तांचे झुंजार नेते दिवंगत दि. बा. पाटील यांच्या स्मृतिदिनानिमित्त जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र रायगड-अलिबाग व लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समिती यांच्या संयुक्त विद्यमाने बेरोजगार उमेदवारांसाठी पंडित दीनदयाळ उपाध्याय महारोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे. हा उपक्रम २४ जून रोजी सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत आगरी समाज मंडळाच्या पनवेल येथील महात्मा फुले सभागृहात होणार आहे आहे.

महारोजगार मेळाव्यासाठी कार्यालयाच्या संकेतस्थळावर नोंदणी केलेल्या आस्थापनांनी या विभागाच्या https://rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर प्रथम आपल्याकडे हवे असलेले कुशल/अकुशल मनुष्यबळाची माहिती भरावी.

ही माहिती भरताना प्रथम उपरोक्त संकेतस्थळावर Employment-Employer (List a Job)-Employer Login या क्रमाने जाऊन आपल्या आस्थापनेचा युजर आयडी व पासवर्ड वापरून आपल्या आस्थापनेची माहिती पहावी. त्यातील पंडित दीनदयाळ उपाध्याय जॉब फेअर या ऑप्शनमधून दिसणाऱ्या रोजगार मेळाव्यांच्या यादीतील आपल्या जिल्ह्याच्या नावावरील View Details- Job Details-gree and Post Vacancy-dd New Vacancy ऑप्शनवर क्लिक केल्यानंतर रिक्तपदांची माहिती भरून शेवटच्या पानावरील Save Vacancyवर क्लीक करावे.

ज्या आस्थापनांची यापूर्वी संकेतस्थळावर नोंदणी करण्यात आलेली नाही, त्यांनी https://rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर Employment-Employer (List a Job)-Register या क्रमाने जाऊन नवीन नोंदणी करावी व आपल्याकडील रिक्तपदे https://rojgar.mahaswayam.gov.in संकेतस्थळावर २३ जूनपर्यंत नोटीफाइड करावीत. नवीन नोंदणी करताना संकेतस्थळावर Employment-Employer (List a Job)-Register या ऑप्शन्सचा वापर करून आपल्या आस्थापनेची नोंदणी करावी. आपले व्यवसाय सुरु करण्याबाबतचे प्रमाणपत्र (Incorporation Certificate) नोंदणीमध्ये अपलोड करणे आवश्यक आहे. आपल्या आस्थापनेची नवीन नोंदणी केल्यानंतर आपल्याकडील रिक्तपदे अधिसूचित करुन संकेतस्थळावर पुढील कार्यवाही करावी.

संकेतस्थळावर नवीन नोंदणी करणे व पदे अधिसूचित करणे या संदर्भात काही समस्या असल्यास या कार्यालयाचा दूरध्वनी क्रमांक ०२१४१-२२२०२९ किंवा लिपिक-टंकलेखक महेश भा.वखरे यांच्याशी ९४२१६१३७५७ भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहाय्यक आयुक्त अ. मु. पवार यांनी केले आहे.

# वावंजे येथे शांतता कमिटीची बैठक



**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुका पोलीस ठाणे हद्दीतील वावंजे गाव येथे मोहल्ला कमिटी व शांतता कमिटी सदस्यांची बैठक झाली. या बैठकीत पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक (गुन्हे) जगदीश शेलकर यांनी सर्व सदस्यांच्या अडीअडचणी जाणून घेऊन त्यांना योग्य ते मार्गदर्शन केले.

बैठकीदरम्यान सध्या सोशल मीडियावर चुकीच्या मेसेज प्रसारित होत आहेत. धार्मिक किंवा राजकीय मेसेज, आक्षेपार्ह फोटो, याबाबत माहिती मिळाल्यास तत्काळ बिट चौकी तसेच पोलीस ठाणे येथे संपर्क करून अवगत करावे. धार्मिक किंवा राजकीय, तेढ निर्माण करणारे मेसेज आल्यास ते पुढे फॉरवर्ड करू नये आणि ज्यांनी पाठवले असेल त्याला देखील समज द्यावी. गावात किंवा रहिवासी परिसरात कोणी महिला व लहान मुले, मुलींना त्रास देत असल्यास त्याबाबत पोलीस ठाणे ते त्वरित माहिती द्यावी अशा सूचना पोलीस निरीक्षक (गुन्हे) जगदीश शेलकर यांनी उपस्थितांना दिल्या, तसेच आगामी साजरे होणारे सण-उत्सव तसेच पुढील काळात होणाऱ्या सार्वजनिक निवडणुका या अनुषंगाने सर्वांनी सतर्क राण्यांचे आवाहन केले.

यावेळी गोपनीय विभागाचे कुंवर व पंकज शिंदे यांच्यासह सदस्य उपस्थित होते.

# तुपगाव ग्रामपंचायत हद्दीत विकासाची गंगा

## ग्रामस्थांमध्ये समाधान

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

उरण विधानसभेचे कार्यसम्राट आमदार महेश बालदी तसेच लोकनियुक्त सरपंच रवींद्र कुंभार यांच्या अथक प्रयत्नातून तुपगाव गावामध्ये विकासाची गंगा आणण्याचे काम खऱ्या अर्थाने केले आहे.

विकासाची गंगा आणण्याच्या कामात लोकनियुक्त सरपंचांना तोला मोलाची साथ लाभली आहे ती गावातील भारतीय जनता पार्टीचे सर्व ज्येष्ठ श्रेष्ठ कार्यकर्ते तसेच ग्रुप ग्रामपंचायत तुपगावचे विद्यमान उपसरपंच सुयोग भालेकर, ग्रुप ग्रामपंचायत सदस्य सचिन साखरे, निलेश मोरे, कांताताई सुरेश नागावकर यांची. तसेच सर्व मतदार बंधू भगिनी यांनी जो आमदारकी व ग्रामपंचायतीच्या निवडणुकीमध्ये आमदार महेश बालदी व सरपंच रवींद्र कुंभार यांच्यावर विश्वास दाखवून मतदानारुपी त्यांना मदत करून ग्रामपंचायतीचा कारभार सोपविला.

खऱ्या अर्थाने गावातील अनेक प्रलंबित महत्त्वाची कामे त्यांनी काही महिन्यातच करून दाखवलेली आहेत मग त्याच्यामध्ये मुख्य स्मशानभूमी रस्ता २५ लाख असेल बौद्ध समाज मंदिराला ४० लाख नीधी, बौद्ध वस्तीमध्ये अंतर्गत रस्त्यासाठी १० लाख निधी, असेल विठ्ठल मंदिर ते शंकर मंदिर येथील मुख्य रस्ता १० लाख असेल, पालीगावामध्ये मंदिराचा सभा मंडप २२ लाख असेल वरद आगण सोसायटी कडे जाणारा रस्ता ३ लाख असेल, सोनवणे च्या येथील गटाराचे मुख्य काम २ लाख ८० हजार असेल, पाली येथे गणेश घाट ३ लाख असेल, तुपगाव व्यायामशाळा ७ लाख ५० हजार असेल, तुपगाव साठी घंटागाडी ७ लाख ५० हजार असेल, बाबू खान ते तोफिक खान यांच्या घरामागील रस्ता ६ लाख असेल, जल जीवन मिशन अंतर्गत २ कोटी ६० लाख पाण्याची टाकी असेल, अशा विविध कामांसाठी जवळ जवळ ऐकून ३ कोटी ९६ लाख ८० हजार रुपये भरघोस निधी उपलब्ध करून गावाचा कायापालट काही महिन्यातच करण्याचा त्यांनी ध्यास व प्रयत्न केलेला आहे आणि या सर्वांसाठी त्यांना जी मोलाची साथ लाभली.

आमदार महेश बालदी यांच्या माध्यमातून होत आहे आणि त्यांनी आपल्या गावावर जो विश्वास दाखवलेला आहे गावामध्ये विकासाच्या कामासाठी भरभरून त्यांनी निधी उपलब्ध करून दिलेला आहे याबद्दल आमदार बालदी आणि सरपंच रवींद्र कुंभार यांचे ग्रामस्थांनी आभार मानले आहेत.

पान १ वरून

# भाजपची पनवेल विधानसभा टिफिन बैठक उत्साहात

भाजपने विधानसभा मतदारसंघानिहाय स्थानिक कार्यकर्त्यांशी संवाद साधण्यासाठी टिफिन बैठकीचे आयोजन केले होते. या बैठकीच्या संकल्पनेनुसार आपापल्या घरून जेवणाचा डबा आणून सामुदायिक भोजन करण्यात आले तसेच चर्चात्मक संवाद साधण्यात आला.

दरम्यान, या वेळी भाजपचे कर्जत तालुका सरचिटणीस राजेश भगत यांच्या नेतृत्वाखाली दहिवली ग्रामपंचायतीमधील राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रल्हाद राणे, उमेश राणे, सुनील चव्हाण, अंकुश शेंडे, कल्पेश मेंगाळ, गौतम कातवरे, मनोहर भोईर, जितेंद्र महाजन यांनी भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला. या सर्व प्रवेशकर्त्यांचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी पक्षाची शाल देऊन स्वागत केले.



# खोपोली नगर पथविक्रेता समितीचे आरक्षण जाहीर

**खोपोली : रामप्रहर वृत्त**

खोपोली नगर परिषद हद्दीमधील नगर पथविक्रेता समिती निवडणूक जाहीर करण्यात आली असून त्याची आरक्षण सोडत नगर परिषदेच्या चौथ्या मजल्यावरील सभागृहात काढण्यात आली. या वेळी शहरातील विविध भागामधून पथविक्रेत्यांनी हजेरी लावली होती व खेळीमेळीच्या वातावरणात आरक्षण सोडत पार पडली.

शहरामधील नोंदणीकृत पथविक्रेता मधून एकूण आठ सदस्य निवडले जाणार आहेत या आठ जागांपैकी १/३ म्हणजे तीन जागा या महिलांकरिता राखीव आहेत. सर्वसाधारण प्रवर्गाकरिता असणाऱ्या तीन जागांपैकी एक जागा महिलांकरिता राखीव आहे. महिलांकरिता राखीव असणाऱ्या उर्वरित दोन जागा या अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग, अल्पसंख्याक, विकलांग व्यक्ती यामधून चिट्ठी सोडत पद्धतीने आरक्षित करायच्या होत्या. त्यानुसार सभागृहात शाळेतील मुलांच्या हातून चिठ्या काढण्यात आल्या. त्यामधून अनुसूचित जाती व अल्पसंख्याक या दोन प्रवर्गासाठी महिलांकरिता आरक्षित झालेले आहे.

मुख्याधिकारी अनुप दुरे यांच्या मार्गदर्शनानुसार नगर पथविक्रेता समिती निवडणुकीचे नियोजन करण्यात आले असून या सोडतीसाठी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून समीर चव्हाण सहाय्यक कामगार आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली प्रक्रिया पूर्ण केली. या वेळी सहाय्यक निवडणूक अधिकारी गौतम भगळे (उपमुख्याधिकारी) यांनी प्रास्ताविक करून आरक्षणाबाबत माहिती दिली, तर आभार पंकज खोत यांनी मानले. या वेळी सविता जाधव, विश्वास पाटील, शेखर शहाणे यांनी आरक्षण सोडत पार पाडण्यासाठी कार्यरत होते.

# 'आदिपुरुष'चा फर्स्ट डे फर्स्ट शो हाऊसफुल्ल!

**मुंबई : प्रतिनिधी**

अभिनेत्री क्रिती सेनन आणि अभिनेता प्रभास यांचा 'आदिपुरुष' हा चित्रपट शुक्रवारी (दि. १६) प्रदर्शित झाला आहे. रामायणावर आधारित असलेल्या चित्रपटाचे दिग्दर्शन मराठमोळ्या ओम राऊत याने केले आहे. 'आदिपुरुष' हा चित्रपट हिंदी, तमिळ, तेलुगू, कन्नड आणि मल्याळम या भाषांमध्ये प्रदर्शित होणार आहे. ६ हजार २०० स्क्रीन्सवर २ डी आणि ३ डी मध्ये चित्रपट प्रदर्शित होत आहे. चित्रपटाचा फर्स्ट डे फर्स्ट शो हाऊसफुल्ल ठरला असून चित्रपटाने पहिल्याच दिवशी १०० कोटींचा टप्पा पार केल्याचा अंदाज बांधला जात आहे.

## निवडक

### पनवेलमध्ये नालेसफाई अंतिम टप्प्यात

**पनवेल :** महापालिकेमार्फत सिडको वसाहतीतील पावसाळी नाले तसेच अंतर्गत नालेसफाई करण्यात येत आहे. तसेच दरवर्षी पाणी तुंबणाऱ्या ठिकाणांवर विशेष लक्ष दिले जात असून पाऊस सुरू होण्यापूर्वीच जागोजागी पाण्याचे पंप लावले आहेत. महापालिकेकडून शहरातील प्रमुख नाल्यांची नवीन पनवेल, खांदा कॉलनी, कळंबोली, खारघर, कामोठे या सिडको वसाहतीमधून २०० किमी लांबीच्या जीर्ण मलनिस्सारण वाहिन्या व ५७७ किमी लांबीची गटारे व पावसाळी नाले आहेत. पावसाच्या पाण्याचा निचरा करण्याकरिता या गटारांची सफाई पालिकेने केली आहे.

### तळोजातील अतिक्रमण जमीनदोस्त

**पनवेल :** तळोजा एमआयडीसीलगत पालिकेच्या जागेत केलेला अतिक्रमण पालिकेच्या अतिक्रमण विभागाने जमीनदोस्त केला. तळोजा एमआयडीसी बायपास लगत पालिकेच्या मोकळ्या जागेवर काहीही व्यवसायिकांनी कब्जा करून गोडाऊन आणि गाळे उभारले होते. पालिका अधिकारी जितेंद्र मढवी यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण पथकाने जेसीबी, कामगार आणि पोलिसांच्या मदतीने कारवाई करून जमीनदोस्त केले. तर गुरुवारी तळोजा फेज एकमधील फेरीवाल्यावर कारवाई केली आहे.

### पनवेल परिसरात आढळला मृतदेह

**पनवेल :** परिसरात एका ४० ते ४५ वयोगटातील अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळला आहे. शहर पोलीस या मृत व्यक्तीच्या नातेवाईकांचा शोध घेत आहेत. या व्यक्तीचे अंदाजे वय ४० ते ४५ वर्षे असून तो रंगाने सावळा, उंची अंदाजे पाच फुट चार इंच, डोक्याचे केस काळे व पांढरे बारीक आहे. यबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास शहर पोलीस ठाणे दूरध्वनी (०२२-२७४५२३३३) किंवा पोलीस उपनिरीक्षक उद्धव सोळंके यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### गळ्यातील चेन खेचून चोरटे पसार

**पनवेल :** घरी जाणाऱ्या साठ वर्षे महिलेच्या गळ्यातील सोन्याची चेन मोटरसायकलवर आलेल्या चोरट्यांनी चोरून नेली. या प्रकरणी कामोठे पोलीस अधिक तपास करीत आहेत. कळंबोली वसाहतीमधील सेक्टर दोन ई येथील अहिल्या परशुराम म्हात्रे या नातेवाइकांना भेटण्यासाठी पेण येथे गेल्या होत्या. त्या बसने पनवेल येथे आल्यावर रिक्षाने घरी जात असताना त्यांच्या गळ्यातील सोन्याची चेन आणि सोन्याची मोटरसायकलवर आलेल्या चोरट्यांनी चोरून नेली. या प्रकरणी कामोठे पोलिस अधिक तपास करीत आहेत.

### खारघरमध्ये भटक्या कुत्र्यांची दहशत

**पनवेल :** खारघर सेक्टर ३६ येथील व्हॅलीशिल्प परिसरात भटक्या कुत्र्यांची दहशत वाढली आहे. या परिसरात राहणारे नागरिक कुत्र्यांच्या दहशतीमुळे हैराण आहेत. व्हॅलीशिल्प सोसायटीने महापालिकेच्या पशू विभागाला पत्र लिहून भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी केली आहे. या सोसायटीतील लहान मुले, ज्येष्ठ नागरिकांना बाहेर पडणे धोकादायक झाले आहेच, परंतु सोसायटीत येणाऱ्या कामगार महिला, कुरीअर, पार्सलवाले यांच्यातही कुत्र्यांची दहशत निर्माण झाली असल्यामुळे सोसायटीच्या आवारात कोणी येण्यास तयार होत नाही.

### पाले खुर्द येथे दुग्धव्यवसाय प्रशिक्षण

**पनवेल :** दीपक फर्टिलायझर्स ॲण्ड पेट्रोकेमिकल्स कॉर्पोरेशन तसेच ईशान्य फाउंडेशन मार्फत पाले खुर्द येथे दुग्ध व्यवसाय प्रशिक्षण घेण्यात आले. या प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन दीपक फर्टिलायझरचे सिंग व पंचायत समितीचे एलडीओ सुनील काटकडे यांनी केले. या वेळी दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांना डॉ. शौकत शिकलगर, श्रीहरी खाटावकर व प्रितेश सरोदे यांनी मार्गदर्शन केले. दीपक फर्टिलायझर्स यांच्या सीएसआर उपक्रमांतर्गत ५५ गावामध्ये हा उपक्रम राबवला जात असून कृत्रिम रेतन सुविधा, चारा पीक विकास, गाई खरेदीसाठी मदत, लसीकरण, पशुधन आरोग्य सुविधा व शेतकऱ्यांसाठी क्षमता बांधणी इत्यादी घटकांवर काम केले जात आहे.


# वाढत्या चोऱ्या रोखण्यासाठी पोलीस सज्ज

## गुन्हेगारांचा शोध घेण्यासाठी विशेष पथक स्थापन

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलसह नवी मुंबईमध्ये वाढत्या वाहनचोरी आणि घरफोड्यांवर नियंत्रण मिळविण्यासाठी नवी मुंबईचे पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी स्वतंत्र पथक स्थापन केले आहे. वाढत्या वाहनचोरींची दखल पोलीस आयुक्तांनी घेत चार सहाय्यक पोलीस निरीक्षकांचे विशेष पथक चोरट्यांचा शोध घेण्यासाठी नेमले आहे.

सध्या पनवेलसह नवी मुंबई परिसरातून वाहनचोरी आणि घरफोड्यांचे प्रमाण खूप वाढले आहे. याची दखल घेत नवी मुंबईचे पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी वाहनचोरी आणि घरफोड्यांवर नियंत्रण आणण्यासाठी विशेष पथक तयार केले आहे. पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी नवी मुंबईतील पाच हजार पोलीस कर्मचारी व अधिकाऱ्यांमधून निवडून सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रताप देसाई, उत्तम घेंगडमल, प्रवीण फडतरे, ईशांत खरोटे या चार अधिकाऱ्यांना चोऱ्या रोखण्याची जबाबदारी दिली आहे.





नवी मुंबई गुन्हे अन्वेषण शाखेचे सहाय्यक पोलीस आयुक्त विनायक वस्त यांच्या मार्गदर्शनाखाली हे चारही अधिकारी थेट काम करणार आहेत. नव्याने स्थापन केलेले आयुक्तांचे विशेष पथक किती दिवसांत वाहनचोऱ्या आणि घरफोड्या रोखतात याकडे वाहनमालकांचे लक्ष लागले आहे.

पनवेलसह नवी मुंबईत चोरांचा सुळसूळाट वाढला आहे. घरफोडी, चेन स्नॅचिंग, फसवणूक, असे गुन्हे पनवेल परिसरात सर्रास होताना दिसत आहेत. या घटनांमुळे परिसरातील नागरिकांत भितीयुक्त वातावरण निर्माण झाले आहे. अशा गुन्हेगारीला रोखण्यासाठी पोलीस सज्ज झाले आहेत.

## पनवेल स्टेशन रोडवर नवीन दिवे

### भाजपचे रावसाहेब खरात यांचा पाठपुरावा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल प्रभाग क्रमांक १७ आणि प्रभाग क्रमांक २० मधील नर्मदा कॉम्प्लेक्स पाण्याच्या हौदापासून ते पनवेल रेल्वे स्टेशन रोड रस्त्याच्या कडेला नवीन लाईटचे पोल बसविण्यात आले आहेत. यासाठी भाजप अनुसूचित जाती मोर्चा पनवेल तालुका उपाध्यक्ष व बुथ कमिटी ४२८चे अध्यक्ष रावसाहेब खरात यांनी पनवेल महापालिकेकडे पाठपुरावा केला.



नर्मदा कॉम्प्लेक्स पाण्याच्या हौदापासून ते पनवेल रेल्वे स्टेशन रोड रस्त्याच्या कडेला असलेले लाईटचे जुने पोल बरेच खराब झाले होते. रस्त्याच्या बाजूच्या पूर्ण पोलची रात्रीच्या वेळेस लाईटचा उजेड कमी प्रमाणात पडत होता. भगत चाळ नवनाथ नगर मालधक्का रहिवाशांना आणि रेल्वेने येणाऱ्या जाणाऱ्या प्रवाशांना अंधाराचा त्रास होता, म्हणून रावसाहेब खरात यांनी माजी नगरसेवक ॲड. प्रकाश बिनेदार, ॲड. मनोज भुजबळ, अजय बहिरा, तेजस कांडपिळे, माजी नगरसेविका सुशीला घरत, चारुशिला घरत, ॲड. वृषाली वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल महापालिकेकडे पाठपुरावा केला. याकामी त्यांना भाजप उत्तर रायगड जिल्हा झोपडपट्टी सेल संयोजक राहुल वाहुळकर, सामाजिक कार्यकर्ते राजू बगाटे यांचे सहकार्य लाभले.

नविन लाईटचे पोल बसविण्यात आल्यामुळे स्थानिक रहिवाशांकडून आणि रेल्वेने येणाऱ्या जाणाऱ्या प्रवाशांकडून भाजप नगरसेवक, नगरसेविका, पदाधिकारी, कार्यकर्त्यांचे आभार मानले आहेत.



**पनवेल : तालुक्यातील चिपळे ग्रुप ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी भारतीय जनता पक्षाचे धनंजय लक्ष्मण पाटील यांची बिनविरोध निवड झाली आहे. त्याबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी धनंजय पाटील यांचे अभिनंदन केले तसेच पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजप युवा मोर्चा तालुका सरचिटणीस विश्वजीत पाटील, रोशन पाटील, सुजित बक्शी उपस्थित होते.**



**पनवेल : भाजपचे खारकोपर अध्यक्ष सुधीर ठाकूर यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, वाहतूक सेल उपाध्यक्ष हेमंत ठाकूर, वामन पाटील, अनंता ठाकूर, भार्गव ठाकूर, जयवंत देशमुख, ग्रामपंचायत सदस्य योगिता भगत, जोत्स्ना ठाकूर, अशोक कडू, सुहास भगत, किशोर पाटील, व्ही. के ठाकूर, साईचरण म्हात्रे, गजानन घरत, पी. के. ठाकूर, कमलाकर घरत, अवी ठाकूर आदी उपस्थित होते.** (छाया : अक्षय शार्दुल)

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात इंडक्शन प्रोग्रॅम

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात शुक्रवारी (दि. १६) ११ वाजता माहिती तंत्रज्ञान व रसायनशास्त्र या दोन्ही विभागाच्या वतीने द्वितीय वर्षाच्या व तृतीय वर्षाच्या विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी इंडक्शन प्रोग्रामचे आयोजन केले होते.



या इंडक्शन प्रोग्रामसाठी महाविद्यालयातील रसायनशास्त्र व माहिती तंत्रज्ञान विभागातील द्वितीय व तृतीय वर्षातील विद्यार्थी व विद्यार्थिनींनी उपस्थिती दर्शवली व या इंडक्शन प्रोग्रॅमच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महाविद्यालयांमध्ये घेण्यात येणाऱ्या वेगवेगळ्या ॲक्टिव्हिटीज तसेच वेगवेगळे कोर्सेस व प्रोग्रॅम्सबद्दल मोलाची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. प्रस्तुत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी यावेळी उपस्थित राहून महाविद्यालयातील दोन्ही विभागातील विद्यार्थी व विद्यार्थिनींना मोलाचे मार्गदर्शन केले व शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमासाठी माहिती व तंत्रज्ञान विभाग प्रमुख प्रा. मीनल मांडवे व शास्त्र विभाग प्रमुख प्रा. महेश्वरी झिरपे तसेच दोन्ही विभागातील सर्व प्राध्यापक वृंद तसेच शिक्षकेतर कर्मचारी या कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

## बसला वाचवण्याच्या प्रयत्नात एसटी बस कोसळली नाल्यात

**पनवेल : वार्ताहर**

मुंबई सेंट्रलवरून महाबळेश्वर जाणारी एसटी बस खारघर हिरानंदानी ब्रिज खालून जात असताना बंद पडलेली एनएमएमटी बस वाचवण्याच्या प्रयत्नात एसटी नाल्यात कोसळली.

एनएमएमटी बस बंद पडली असल्याने रस्त्याच्या उजव्या बाजूला अंधारात उभी होती. बसला वाचविण्याच्या नादात एसटीचालकाचे एसटी डाव्या बाजूला घेत असताना एसटी चालकाचे नियंत्रण सुटले आणि फुटपाथवर चढुन एसटी ४ ते ६ फूट खोल नाल्यालगत जावून कोसळली. एसटीमध्ये एकूण १७ प्रवासी प्रवास करत असताना या अपघातात कोणत्याही प्रवाशाला गंभीर दुखापत झाली नाही. मुंबई सेंट्रल ते महाबळेश्वरला जाणारी एसटी खारघर हिरानंदनी ब्रिजखाली एसटी थांबा प्रवाशी घेण्याकरता जात असताना हा अपघात झाला.

या अपघातात एसटीचे मोठे नुकसान झाले आहे. दोन क्रेनच्या सहाय्याने एसटी बाहेर काढली.

# अमर पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त कळंबोलीमध्ये मोफत आरोग्य तपासणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या स्थायी समितीचे माजी सभापती अमर पाटील यांचा वाढदिवस शुक्रवारी (दि. १६) विविध सामाजिक उपक्रम राबवून मोठ्या उत्साहात साजरा झाला. वाढदिवसानिमित्त त्यांनी कळंबोली सेक्टर १० येथील आशा मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये मोफत आरोग्य तपासणी शिबिर आणि औषध वाटप कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या शिबिराला भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट देत अमर पाटील यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.





पनवेल महापालिकेच्या स्थायी समितीचे माजी सभापती अमर पाटील हे त्यांच्या वाढदिवस विविध सामाजिक आणि आरोग्यदायी उपक्रम राबवून साजरा करत असतात. त्यानुसार वाढदिवसानिमीत्त अमर पाटील यांनी कळंबोली सेक्टर १० येथील आशा मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये 'मोफत आरोग्य तपासणी आणि औषध वाटप शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिरात हृदयविकार, ॲनजीओग्राफी, स्त्रीरोग, कान, नाक, घसा, हाडे, नेत्र, दंतरोग, रक्त यांसार तपासण्या करण्यात आल्या. या शिबिराचा अनेक नागरीकांनी लाभ घेतला.

या वेळी भाजपचे कळंबोली शहर अध्यक्ष रविनाथ पाटील, माजी नगरसेविक हरेश केणी, बबन मुकादम, प्रवीण पाटील, माजी नगरसेविका प्रमिला पाटील, मोनिका महानवर, माजी सरपंच अरुण पाटील, भाजप नेते अशोक मोटे, प्रकाश शेलार, संदीप म्हात्रे, देविदास खेडकर, युवा मोर्चाचे अमर ठाकूर, सुनील ढेंबरे, युवा मोर्चा जिल्हा सचिव जमीर शेख, प्रकाश महानवर, आबा घुटुकडे, सरचिटणीस दिलीप बिष्ट, महिला मोर्चा अध्यक्ष मनिषा निकम, सरचिटणीस दुर्गा सहानी, कविता गुजर, संजय दोडके, विनोद बोरसे, प्रकाश शेलार, केशव यादव, निशाण गिल, मयुरी पर्वी, भगमुनी शाह आदी उपस्थित होते. शिबिर यशस्वी करण्यासाठी डॉ. विजय डोंगरे, डॉ. आशा डोंगरे यांचे सहकार्य लाभले.



**कळंबोली : पनवेल महापालिकेच्या स्थायी समितीचे माजी सभापती अमर पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी स्कूलमधील जुनिअर केजी व सिनिअर केजीच्या विद्यार्थ्यांना स्कूल बॅगचे वाटप करण्यात आले.**

## एसटी कर्मचाऱ्यांच्या बँकेची निवडणूक

### पनवेलमधून विजय कोळी उमेदवार

**पनवेल : प्रतिनिधी**

महाराष्ट्र एसटी को-ऑपरेटिव्ह बँकेच्या सन २०२३ - २०२८ वर्षाकरताच्या संचालक पदाचे निवडणुकीत पनवेलच्या विजय संभाजी कोळी यांचा विजय निश्चित मानला जातो. या निवडणुकीसाठी एकूण ८४ हजार सभासद असलेल्या कर्मचाऱ्यांमधून १९ संचालक निवडले जाणार आहेत. ही निवडणूक २३ जून २०२३ रोजी होणार आहे. मुंबई, रायगड या दोन जिल्ह्याचे प्रतिनिधी म्हणून पनवेल आगारात गेली १८ वर्ष काम करणारे विजयकुमार संभाजी कोळी महाराष्ट्र एसटी कामगार संघटनेच्या पॅनलकडून उमेदवार म्हणून लढत आहे.



अतिशय सर्व सामान्य कुटुंबामधून तयार होत असलेले एक आदर्श व्यक्तिमत्व म्हणून विजय कोळी यांच्याकडे पाहिले जात आहे. गेली सहा वर्ष मुंबई विभागीय सचिव म्हणून आजपर्यंत संघटनेमध्ये काम करत आहेत. नेहमीच एस.टी. कर्मचाऱ्यांच्या हितासाठी वेगवेगळ्या मुद्द्यावर प्रशासनाशी भांडण करुन कर्मचाऱ्यांच्या हितासाठी कार्य करणारे व्यक्तिमत्व म्हणून त्यांना ओळखले जाते.

ग्रामीण व शहरी भागातील कर्मचारी, अधिकारी यांनी आपले बहुमूल्य असे मत विजय कोळी आणि महाराष्ट्र एसटी कामगार संघटनेच्या पॅनलला देऊन सेवा करण्याची संधी द्यावी, अशी मागणी विजय कोळी मित्रपरिवार मुंबई आणि रायगड जिल्हा यांच्या वतीने करण्यात आली आहे.



**पनवेल : भाजपचे ज्येष्ठ कार्यकर्ते जगदीश घरत यांना वाढदिवसानिमित्त गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत यांनी शुक्रवारी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजप वाहतूक सेलचे जिल्हा उपाध्यक्ष हेमंत ठाकूर, भाजप तालुका चिटणीस जयवंत देशमुख, टीआयपीएल कंपनीचे श्री. थवई, चिंतामण घरत आदी उपस्थित होते.**


## संपादकीय

# मोठे संकट टळले...

बिपरजॉय नावाचे प्रचंड क्षमतेचे चक्रीवादळ गुजरातच्या दिशेने घोंघावत निघाल्याचे ध्यानात आल्यानंतर आपत्ती व्यवस्थापन यंत्रणांनी ज्याप्रकारे तयारी केली, ती कौतुकास्पद आहेच, पण त्याचबरोबर अभिमान वाटावा अशीदेखील आहे. बिपरजॉय हे चक्रीवादळ वाटले होते तेवढे भयाकारी निघाले नाही असे काहींना वाटते, परंतु या वादळामुळे कमीत कमी विध्वंस व्हावा यासाठी आपत्कालीन यंत्रणा किती राबल्या याची कल्पना त्यांना येणार नाही.

**बिपरजॉय हे चक्रीवादळ पाकिस्तानातील कराची बंदराला उद्ध्वस्त करू शकले असते किंवा मुंबईची अवस्था त्याने दयनीय करून टाकली असती, परंतु हे चक्रीवादळ गुजरातच्या दिशेने निघाल्याचे स्पष्ट झाल्यानंतर तेथील राज्यसरकार आणि केंद्रीय आपत्कालीन पथके यांनी अथक परिश्रम करून किनाऱ्यालगतच्या सुमारे दीड लाख रहिवाशांना सुरक्षितस्थळी हलवले. घरे अथवा अन्य मालमत्तेचे नुकसान कमी व्हावे यासाठी आवश्यक त्या सर्व काळज्या घेतल्या गेल्या. हे सारे करण्यासाठी आपत्कालीन व्यवस्थेकडे फक्त दोन दिवस होते हे लक्षात घेतलेले बरे. बिपरजॉय चक्रीवादळामुळे प्रचंड हानी होईल अशी भीती व्यक्त केली जात होती, पण सुदैवाने तसे काही झाले नाही. भावनगरमध्ये शेळ्यामेंढ्यांना वाचवण्याच्या धडपडीत दोघे जण वादळाच्या तडाख्यात सापडून मृत्यू पावले. काही जनावरे दगावली, असंख्य झाडे आणि विजेचे खांब उलथून पडल्याने तब्बल ९४० गावांमधली वीज गायब झाली. या पलीकडे नुकसान झाल्याची नोंद अद्याप तरी झालेली नाही. गुरूवारी संध्याकाळी सातच्या सुमारास गुजरात किनाऱ्यावरील जखाऊ या किनाऱ्यालगतच्या गावाला वादळाचा पहिला तडाखा बसला. रात्रभर ताशी १०० ते १२० किमी वेगाने वारे वाहात होते. तथापि शुक्रवारी दुपारनंतर मात्र वाऱ्याचा जोर ओसरला असे दिसते. पंतप्रधान नरेंद्र मोदी स्वत: या काळात आपत्कालीन व्यवस्थेवर डोळ्यात तेल घालून नजर ठेवून होते. मनुष्यहानी शक्य तो होता कामा नये अशा स्पष्ट सूचना त्यांनी दिल्या होत्या. इतकेच नव्हे तर गिरच्या जंगलातील सिंहांच्या सुरक्षेची चौकशी त्यांनी आवर्जून केली. बिपरजॉय वादळामुळे कमीत कमी नुकसान झाले याचे संपूर्ण श्रेय आपत्कालीन यंत्रणांना द्यायला हवे. गुजरात सरकारनेही त्यासाठी युद्ध पातळीवर काम केले. एकेकाळी आपल्या देशात चक्रीवादळामुळे अपरिमित नुकसान होत असे. शेकडो माणसे आणि हजारो जनावरे प्राणांस मुकत. शेकडो गावे आणि वस्त्या उद्ध्वस्त झाल्यानंतर त्यांच्या पुनर्वसनासाठी अनेक वर्षे लागत. परंतु विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या साथीने पंतप्रधान मोदी यांचा आधुनिक भारत नैसर्गिक आपत्तींशी झुंजण्यास सक्षम झाला आहे याचे प्रत्यंतर बिपरजॉय चक्रीवादळाबाबत आले. हवामानाचा अभ्यास करणारे उपग्रह, हवामानातील बदल टिपून त्याचे क्षणाक्षणाला अहवाल पाठवणाऱ्या इलेक्ट्रॉनिक यंत्रणा यांच्या साह्याने समुद्रातील चक्रीवादळांचा प्रवास, दिशा आणि वेग यांचे अचूक गणित मांडता येते. त्यामुळे पूर्वतयारीसाठी आपत्तीकालीन यंत्रणांना थोडा अधिक वेळ मिळू शकतो. बिपरजॉयच्या बाबत नेमके हेच घडले. गुजरातच्या किनाऱ्यालगतचा भाग आणि कराची बंदराच्या लगतचा काही भूभाग येथे बिपरजॉय चक्रीवादळाने रात्रभर धिंगाणा घातला. परंतु फारसे नुकसान न करता हे वादळ राजस्थानकडे निघून गेले, तेव्हा त्यातील जोर जवळपास संपला होता. अर्थात एका चक्रीवादळाला समर्थपणे तोंड दिल्यानंतर बेसावध राहण्याचे कारण नाही. निसर्गाच्या रौद्रावतारापुढे माणूस नेहमीच नगण्य असतो हे ध्यानात ठेवले पाहिजे.**

# सुधागडात प्राचीन लेण्यांचा वैशिष्ट्यपूर्ण ठेवा

खबरबात
धम्मशील सावंत

सुधागड तालुक्यात प्राचीन व भव्य लेण्यांचे समूह आढळतात. निसर्गाच्या कुशीत वसलेल्या या प्राचीन बौद्ध कालीन लेण्या वैशिष्ट्यपूर्ण आहेत. येथील ठाणाळे, नेणवली, गोमाशी व चांभार लेणी अशा भव्य लेण्यांचा समूह आहे. प्राचीन व मौलिक इतिहासाची भरभक्कम साक्ष देणाऱ्या या वास्तू इतिहास अभ्यासक व देश विदेशातील पर्यटकांच्या पसंतीच्या ठरतात. मात्र त्यांचे सुव्यवस्थित जतन व संगोपन होण्याची अतिशय आवश्यकता आहे.

**ठाणाळे लेणी**

ठाणाळे लेणी समूहात चैत्यगृह, स्मारक,– स्तुपसमुह, सभागृह व उर्वरित २१ विहार लेणी आहे. बहुतांश विहारांमध्ये व्हरांडे आणि एक किंवा दोन खोल्या असून त्यामध्ये शयनासाठी ओटे आहेत. काही विहारांमध्ये समोरच्या भागात दालन व चार पाच भिक्षूंच्या निवासाची व्यवस्था आहे. अशा विहारात आंतरदालन, प्रवेशद्वार, खिडकी व शयन ओटे आहेत. पाच पायऱ्या असलेल्या एका विहारात वाकाटककालिन रंगीत चित्रांचे काही अवशेष दिसतात. प्राकृत ब्राम्ही लिपीतील शिलालेख असलेले एक पाण्याचे टाके आहे. पाण्याचे हौद, टाके, ब्राम्ही शिलालेख भित्तीचित्र आहेत. या सर्वांची मोठ्या प्रमाणात पडझड झाली आहे. बरेच अवशेष भग्नावस्थेत आहेत. अनेक उपद्रवी लोकांनी येथील स्तुप, चैत्यगृह, स्मारक यावर चुन्याने व ऑईल पेन्टने आपली नावे कोरली आहेत. त्यामुळे या ऐतिहासिक वास्तूंचे सौंदर्य लुप्त झाले आहे. ठाणाळे लेण्यांसारखा ऐतिहासिक व पुरातन ठेवा जतन करण्यासाठी प्रशासनाकडून विशेष व प्रभावी उपाययोजना राबविण्यात यावी, अशी मागणी पर्यटकप्रेमी व लेणीप्रेमी यांनी केली आहे.

ठाणाळे लेण्यांचा काळ हा इ.स. पुर्व दुसऱ्या शतकापासुन इ.स. ५ व्या शतकापर्यंत आहे. हि लेणी डोंगरामध्ये पश्चिमाभिमुख कोरलेली आहेत. लेण्यात सापडलेल्या विविध वस्तु व मौर्यकालीन चांदीची नाणी पाहाता ही लेणी २२०० वर्षापूर्वीची असल्याचे अनुमान काढण्यात येतो. लेण्यांचा दगड हा अग्निजन्य (बेसाल्ट) दगड आहे. शिल्पकलेच्या दृष्टीने अप्रतीम असलेल्या तसेच मानवी जिवनाच्या आर्थिक जडणघडणीत या लेण्यांनी महत्वाची भूमिका बजावली आहे. हि लेणी समुद्र किनार्यावरून चौल–धरमतर–नागोठणे खाडीमार्गे देशावर जाणारी व्यापारी केंद्रे होती असे म्हटले जाते. वाघजाई, घाटातून मावळात जाणारा प्राचीन मार्गही या लेण्यांजवळुन जातो. यामुळे ही लेणी चौल बंदराच्या सानिध्याने खोदली गेली आहेत. कोकणातून घाटमार्गे देशावर जात–येतांना विश्रांतीचे स्थान म्हणून या लेण्यांचा उपयोग केला गेला. त्याचबरोबर बौद्ध भिक्षूंच्या भदन्त, आचार्य, परित्राजक यांच्या निवार्यासाठी सुद्धा या लेण्यांचा उपयोग इ.स. ५ व्या शतकापर्यंत करण्यात आला आहे. या लेण्या अतिशय प्राचिन असुन ऐतिहासिक दृष्ट्या खुप महत्वाच्या आहेत. त्यामुळे पुरातत्व खात्याने वेळीच या लेण्यांची डागडुजी व देखभाल करणे गरजेचे आहे. येथे येणार्या पर्यटकांनी लेण्यांवर नावे टाकुन येथील सौदर्याला गालबोट न लावता, येथिल परिसर साफ व संरक्षित कसा राहिल याची दक्षता घेतली पाहीजे. असे आवाहन शिवऋण प्रतिष्ठानने केले आहे. शिवऋण प्रतिष्ठान तर्फे येथील परिसर साफ करुन त्यासंदर्भातील लघुपटही प्रसिद्ध केला आहे.

पालीपासुन ठाणाळे हे गाव १५ किमी अंतरावर आहे. ठाणाळे या गावी येण्यासाठी नाडसुरपर्यंत एस.टी.ची सुविधा उपलब्ध आहे. नाडसुर ते ठाणाळे हे २ कि.मी. अंतर असून तेवढेच अंतर लेण्याकडे जाण्यासाठी चालावे लागते. ठाणाळे गावच्या पुर्वेकडे असलेल्या जंगलामध्ये ही लेणी आहेत. त्या भागाला चिवरदांड असे म्हणतात. क्रांतीकारक वासुदेव बळवंत फडके यांनी ही येथे आश्रय घेतला होता.

**नेणवली व चांभार लेणी**

खडसांबळे व नेणवली गावाजवळ सह्याद्री पर्वतात नेणवली लेण्या आहेत. लेण्याचा मार्ग या दोन्ही गावापासून खरबाच्या वाटेने घनदाट अशा लेण्या डोंगरामध्ये जातो लेणी गावापासून साधारण अडीच किमी अंतरावर आहेत व येथील जंगल राखीव वनक्षेत्र आहे. अतिशय दुर्गम असलेल्या या लेणी समूहात एकूण २१ लेण्या आहेत. काही लोक पूर्वापार या लेण्यांना पांडवलेणी म्हणूनच संभवतात.

लेण्यांतील सर्वांत मोठ्या सभागृहाच्या मागच्या बाजूस उंच व मोठा घुमट आहे. घुमट दगडांमध्ये व्यवस्थित कोरला आहे. घुमटचा व्यास १.५ मीटर उंची ३.५ मीटर आहे. घुमटाच्या अगदी वर मध्यभागी झाकणासारखा आकार असून चौरसाकृती छिद्र आहे. स्थानिक लोक या घुमटाला रांजण म्हणतात. या लेण्यातील सभागृहे सर्वांत मोठे लेणे आहे. याचा दर्शनी भाग कोसळला असला तरी छत सुरक्षित आहे. महाराष्ट्रातील अतिविशाल सभागृहांमध्ये याचा समावेश होतो. हे सभागृह २१ मीटर बाय १६ मीटर एवढे विशाल आयताकृती आहे. या सभागृहाचे डाव्या बाजूस व मागील भिंतीत एकूण १७ खोल्या खोदलेल्या आहेत. प्रत्येक खोलीत दगडी ओटा आणि चौकोनी खिडकी आहे. काही खोल्या एकांतवासासाठी खोदल्या आहेत. सभागृहांमध्ये ठाणाळे लेण्यांप्रमाणे नक्षीकाम नाही किंवा लेण्यांचा काळ ठरवण्यासाठी शिलालेख नाही. सभागृहाच्या पुढील बाजूस पाणी साठवण्याचे बंदिस्त टाके आहे. लेण्यांमध्ये काही ठिकाणी भिंतीस लागून शयन कोठे बांधले आहेत. व भिंतींमध्ये कोनाडे ठेवण्यात आले आहे. लेणी समूहात एकूण अकरा लेणी असली तरी मुख्य सभागृह व त्याच्या बाजूकडील सदनिका वगळता काही ठिकाणी लेणी कोसळली आहेत. याच लेण्यांच्या पश्चिम बाजूस अर्धा किलोमीटर अंतरावर चांभार लेणी आहेत, परंतु येथील डोंगराचे कडे तुटल्याने येथे जाता येत नाही. या लेणी समूहाचा उपयोग चौल बंदरातून नागोठणे मार्गे मावळात जाणाऱ्या व्यापारी मार्गासाठी केलेला आहे. ही प्राचीन लेणी १८८९ पर्यंत जगात अपरिचित होती परंतु १८९० मध्ये रेव्हरंड ऍबट यांनी लेण्यांचा प्रथम शोध लावला. तेव्हापासून या लेण्यांची काहीही दुरुस्ती झालेली नाही. प्रतिकूल निसर्ग परिस्थिती व मानवी देखभालीची उदासीनता यामुळे लेण्यांचा हा सांस्कृतिक ठेवा यापुढे आणखी किती काळ आपले अस्तित्व टिकवून ठेवेल याबाबत शंका आहे.

**नेणवली लेण्यांपर्यंत कसे पोहचाल?**


पालीपासुन नेणवली व खडसांबळे हे गाव साधारण १५–१६ किमी अंतरावर आहे. खडसांबळे गावी येण्यासाठी पालीवरून एस.टी. ची सुविधा उपलब्ध आहे. खडसांबळे ते लेणी चालत पार करावे लागते.

**गोमाशी लेणी**

गोमाशी येथे बौद्ध लेणी समूह आहे. त्याला काही लोक भृगु ऋषींचे लेणी देखील संबोधतात. गोमाशी गावाजवळ सरस्वती नदीकाठी खोंडा नावाचा डोंगर आहे. या डोंगरातील एका घळीत घळईत १.५ मीटर उंचीची गौतम बुद्धांची प्रतिमा कोरण्यात आली आहे. कोणी याला भृगु ऋषींची मूर्ती म्हणते. हे ठिकाण म्हणजे नागोठणे खाडीमार्गे ताम्हणी घाटात मावळात जाणाऱ्या मार्गावरील एक लेणे आहे. या लेण्यांकडे जायचे असेल तर पाली पासून गोमाशी अंतर १४ किमी आहे. गोमाशी गावापर्यंत एसटीची सोय आहे. या लेण्यांमध्ये देखील मोठी पडझड झाली आहे. लेण्यांपर्यंत जाणाऱ्या मार्गाचीदेखील दुरवस्था झाली आहे.

**जोपासण्याची गरज**


येथील स्तुप, विहार, चैत्यगृह, शिलालेख स्मारक यांची मोठया प्रमाणात पडझड झाली असुन त्यावर अनेक उपद्रवी लोकांनी चक्क ऑईल पेन्टने नावे लिहीली आहेत. त्यामुळे ही ऐतिहासिक व इतिहासाची भरभक्कम साक्ष देणाऱ्या या वास्तु नामषेश होण्याची भिती आहे. प्राचीन इतिहासाची साक्ष देणारा हा मौलिक ठेवा जोपासण्याची नितांत गरज आहे. अनेक देश विदेशातील पर्यटक व बौद्ध अभ्यासक इथे भेट देत असतात. पर्यटकांना योग्य सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्यास या ठिकाणी पर्यटन वाढीला देखील खूप संधी आहे. तसेच हौशी पर्यटकांनी येथील वास्तूला विद्रुप किंवा हानी करू नये.



## बदलते तंत्रज्ञान

# आता कू ॲपवरसुद्धा सब्सक्रिप्शनद्वारे कमाईची संधी

ट्विटरला टक्कर देणाऱ्या भारतीय मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मने कू ॲपने आज मोठी घोषणा केली आहे. कू ॲपने कू प्रीमियम लाँच केले आहे. हे अपडेट खासकरून क्रिएटर्ससाठी आहे, ज्याद्वारे क्रिएटर्सला आपल्या फॉलोवर्सशी अधिक चांगल्या प्रकारे कनेक्ट होण्यास आणि आपल्या कंटेंटवर कमाई करण्याची संधी मिळत आहे.



कू प्रीमियम प्लॅटफॉर्मवरील लाखो कंटेंट क्रिएटर्सला आपल्या सब्सक्रायबर्ससोबत एक्सक्लुझिव्ह कंटेंट शेअर करून आणखी पैसे कमविण्याची संधी देत आहे. कू प्रीमियमसह क्रिएटर्सजवळ एक ठराविक साप्ताहिक/मासिक शुल्कासाठी आपल्या सब्सक्रायबर्ससोबत एक्सक्लुझिव्ह कंटेंट शेअर करण्याचा पर्याय आहे.

क्रिएटर्स टेक्स्ट, व्हिडिओ आणि फोटोंना प्रीमियम म्हणून लेबल करू शकतील आणि ते आपल्या सब्सक्रायबर्ससोबत शेअर करू शकतील, ज्यामुळे प्रीमियम कंटेंट पोस्ट करण्यासोबत कमाई करण्याचा हा सर्वात सोपा प्लॅटफॉर्म आहे. सध्या हे अपडेट फक्त भारतातच उपलब्ध करून दिले जात आहे. विविध प्रकारचा कंटेंट तयार करण्यासाठी क्रिएटर्ससाठी नवीन संधी उपलब्ध करून दिली जात आहे.

यामध्ये कलाकार, वित्त तज्ज्ञ, फँटेसी गेमिंग, वेलनेस, कॉमेडी, म्यूझिक, स्पोर्ट्स आणि इतर कॅटगरीमध्ये आपले कौशल्य दाखवून कमाई करू शकतील. कू ॲप गेल्या महिन्यापासून या फीचरची टेस्टिंग ऋषिका सिंग चंदेल, डॉ. क्रिक पॉइंट, आरती नागपाल यांच्यासह २० क्रिएटर्ससोबत करत आहे आणि आता ते देशभरातील क्रिएटर्ससाठी आणत आहे.

या प्रीमियम सबस्क्रिप्शन फीचपने ग्रामीण आणि शहरी भारतातील प्रतिभावान महिला क्रिएटर्सना आधीच सक्षम केले आहे. यामध्ये मनोरंजक व्हिडिओ बनवणारी उत्तर प्रदेशातील सहारनपूर जिल्ह्यातील एक गृहिणी रचना मावी आणि मध्य प्रदेशातील शिवपुरी जिल्ह्यातील कवयित्री अंजली गुप्ता यांचा समावेश आहे.

दरम्यान, येत्या काही महिन्यांत कू ॲप पत्रकार, बॉलीवूड अभिनेते आणि क्रिकेटपटू यांसारख्या व्हेरिफाइड प्रोफाइल असलेल्या व्यक्तींना जोडण्याची योजना आखली आहे. जेणेकरून हे सर्व आपल्या सब्सक्रायबर्ससोबत जोडले जातील.

# राजमाता जिजाबाई हिंदवी स्वराज्याच्या प्रेरणादायी



## निमित्त

परकीय आक्रमणामुळे प्रजा नाडली–पिडली गेली. स्वधर्मस्वाभिमान सोडून काही हिंदुनी सुलतानाची चाकरी पत्करली. आपले पती शुरवीर शहाजी राजांनी आपले शौर्य शक्ती वादशहाच्या सेवेत खर्च करू नये, असे स्वाभिमानाने जिजाबाईंना वाटत होते. शहाजी राजांचे मन वळविण्याचा जिजाबाईंनी परोपरीने प्रयत्न केला. परंतु त्याचा काही उपयोग झाला नाही.

लखुजी जाधवांची कन्या जिजाबाई अत्यंत बाणेदार स्वाभिमानी स्त्री होती. राज घराण्याचा वारसा असल्याने आपल्या सासरी तसेच माहेरी त्यांनी अनेक लढाया पाहिल्या होत्या. लढाईच्या रोम हर्षक कथा ऐकल्या होत्या. मराठी मुलखात स्वार्थासाठी परकियांची गुलामी करणारे जिजाबाईचे मन व्यथीत होत होते. हिंदुना सक्तीने गोमास खायला लावणारे हिंदु महिलांवर अत्याचार करणाऱ्या मुघल सैनिकांच्या जुलमाने जिजाबाईंचे मन कळवळले. मराठी माणसाला महाराष्ट्राला या संकटातून वाचविण्याचा त्यांनी संकल्प केला. गुलामगिरीच्या सोनेरी साखळीत आपला शिवबा जखडला जावू नये म्हणुन त्यांनी बाल शिवाजीला घडविण्याचे काम हाती घेतले. थोर शुर विरांच्या कथा सांगुन बाल शिवाजीच्या मनावर त्यांनी स्वाभिमान बिंबविला राजकीय डावपेच युध्द कलेचे शिक्षण दादोजी कोंडदेव या आदर्श गुरूकडुन त्यांना दिले.

संघटन हा गुण शिवरायात उपजत होता. सामान्य मावळ्यामध्ये सामील होऊन खेडयापाडया जाऊन निष्ठावंत मावळे सवंगडी संघटीत केले. मुघलांच्या जुलमी अत्याचारा बद्दल त्यांना चिड होती. हे राज्य हिंदुचे व्हावे असे त्यांना मनोमनी वाटे आणि त्यांनी हिंदवी स्वराज्याची संकल्पना मनात ठेवुन शिवरायाच्या मनावर बिंबवली तुळजा भवानीच्या आशिर्वादाने ही सकंल्पना पुरी करण्याचा तीने शिवबाच्या मनात बिंबवुन स्वराज्य स्थापनेस श्री गणेशा केला. शिवाजीची माता जिजाऊ ही राजमाता जिजाऊ साहेबांची मुद्रा आहे जिजाऊसाहेबांच्या सदरे वरून सुटणाऱ्या अज्ञापत्राच्या माथ्यावर दिमाखात ही मुद्रा उमटवली जात असे. स्वतंत्र मुद्रा ती ही एका स्त्री ची हे शिवकाळात एक आश्चर्यच होते. ज्या काळात स्त्रियांना काहीच अधिकार नव्हते त्या काळात शिवाजी राजांची ही माता आपली मुद्रा वापरत होती. एवढच नव्हे तर राज सदरेवर बसुन न्याय निवाडे ही करीत असे जिजाऊ साहेबांनी दिलेली न्याय निवाड्याची काही पत्रेही आज उपलब्ध आहेत. त्यावर उमटवळेचा त्यांच्या मुद्रेसह जिजाऊने दिलेला निर्णय पुत्र शिवबा तर मानत तसेच सर्व गोतावळाही एक मुखाने हा जिजाऊंचा निर्णय मानत असत.

जिजाबाईच्या कतृत्वाचे दाखले पुरावे मराठ्यांच्या इतिहासात अनेक मिळतात. त्यांनी शेतीसाठी शिवगंगा नदीवर बांधलेले धरण या नदीच्या काठावर त्यांनी बसवलेली पेठ खेडेपाड्यात जिजाबाईंनी लोकोपयोगी कामे केली. त्या गावाजवळ जिजाबाईंची खासगी शेती होती. अशा लोकोपयोगी काम करणाऱ्या जिजाबाईंच्या राज्य कारभारात ही भाग घेत असत. अशा या कर्तबगार मातेने शिवरायांची जडण घडणच अशा तऱ्हेने घडविली होती की त्यातुनच स्वराज्य संस्थापक शककर्तेची निर्मिती झाली आणि हिंदुस्थानाला एक नवीन राजा लाभला. सन १९६६ रोजी मिर्झाराजा जयसिंगाशी भेट ठरल्याप्रमाणे शिवाजी राजांना आग्र्याला जावे लागले. राजे आग्राला दि. ६ मार्च १९६६ रोजी स्वराज्यातून निघाले. तेथे ते १७ ऑगस्ट १६६६ पर्यंत औरंगजेबाच्या कैदेत होते. तेथून निसटले आणि चार महिन्यांनी २१ नोहेंबर १६६६ मध्ये नऊ महिन्यांनी स्वराज्यात आले. या नऊ महिन्यांच्या काळात स्वराज्याचा कारभार जिजाबाईनीच सांभाळला होता. नुसता सांभाळला नाही तर ऑगस्ट १६६६ मध्ये कोल्हापुर जवळचा प्रसिद्ध गड रांगण्याचा वेलाम दुर्गम गड जिंकुन स्वराज्याच्या सीमा वाढविल्या होत्या असे हे राजमातेचे प्रशासन होते. जिजाबाई या हिंदवी स्वराज्य घडविणाऱ्या प्रेरणादायी होत्या. स्वराज्याचे तोरण बांधुन तोरणा किल्ला जिंकण्याचे स्वप्न जिजावाईचे होते व स्वराज्याचा श्री गणेशा शिवाजी राजांच्या कडून. घेतलेली जिजामातेची कल्पक बुध्दी होती. जिजाबाई म्हणजे हिंदवी स्वराज्याला लाभलेली देण होती.

शिवरायांची व स्वराज्याची खरी प्रेरणा जिजामाताच होत्या त्यांच्या शिवाय स्वराज्याची कल्पना स्थापना विस्तार यावर आलेल्या फतेखान अफजलखान शाहिस्तेखान मिर्झाराजे दिलेरखान पठाण अशा अनेक संकटांचा यशस्वी सामना या विषयांचा विचार अभ्यास जिजामाते शिवाय पूर्ण होऊच शकत नाही. शिवाय ६ जून १६७४ रोजी राजानी स्वतःस राज्याभिषेक करून घेतल्या नंतर त्या खऱ्या अर्थाने महाराष्ट्राच्या लोकमाता होत्या. लखुजी जाधवासारख्या पराक्रमी पित्याची कन्या शहाजी राज्यांच्या महान पराक्रमी पतीच्या पत्नी आणि शिवाजी सारख्या शककर्तेची माता अशा अनेक रूपात जिजाबाई आपल्यापर्यंत येतात. त्यांच्या ७५ वर्षाच्या आयुष्यात त्यांचे कार्य हे हिंदवी स्वराज्य स्थापनेचे सोनेरी पान होते.

बुलढाणा जिल्हयातील मेहकर तालुक्यातील सिंदखेड राजा इथल्या जाधवांच्या वाडयातील त्यांचे जन्मस्थळ आणि राजधानी रायगडाच्या पायथ्याला पाचाड या गावी त्यांची असणारी समाधी ही ठिकाणी प्रेरणादायी आहेत. मुलांना आईची शिकवण कशी असावी हे जिजामातेकडून शिकावे, माता असावी तर राजमाता जिजाबाई सारखी असा सार्थ अभिमानाने म्हटल जात. मोठ्या जिदिने जिजामातेने पुत्र शिवबाची जडण घडण केली. पुढे शिवरायांनी स्थापन केलेल्या स्वराज्यामागे खरी प्रेरणा होती ती राजमाता जिजाबाईची म्हणूनच राजमाता जिजाबाईंचा हिंदवी स्वराज्य स्थापनेच्या प्रेरणा दायी ठरल्या हे कुणीही नाकारू शकत नाही.

**–धनंजय गोंधळी, चिरनेर, उरण**

## आरोग्य प्रहर

# 'ही' फळे खाल्ल्यास मिळेल आजारांशी लढण्याची ताकद



आपल्या शरीराचे संरक्षण करण्यासाठी व्हिटॅमिन सी खूप महत्वाचे आहे. व्हिटॅमिन सी हे रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करते. व्हिटॅमिन सी पुरेशा प्रमाणात सेवन केल्यास हृदयाशी संबंधित रोग, आरोग्य समस्या आणि त्वचेशी संबंधित समस्या दूर राहण्यास मदत होते. व्हिटॅमिन सी संपूर्ण आरोग्यास चालना देते. व्हिटॅमिन सी जखमा लवकर भरून काढण्यासाठी खूप उपयुक्त आहे.

तसेच व्हिटॅमिन सी मुळे , कूर्चा, हाडे आणि दातांची झीज कमी होते. संत्र्यामध्ये सर्वात जास्त व्हिटॅमिन सी असते असे सर्वसाधारणपणे समजले जाते. पण आपण अशा अनेक फळांबद्दल जाणून घेऊया ज्यात संत्र्यापेक्षा जास्त व्हिटॅमिन सी असते आणि ती लिंबूवर्गीय फळे नाहीत.

**पेरू** – पेरू हे भारताच्या कानाकोपऱ्यात आढळणारे फळ आहे. पेरूमध्येही संत्र्यापेक्षा जास्त व्हिटॅमिन सी असते. १०० ग्रॅम पेरूमध्ये २२८ मिलीग्राम व्हिटॅमिन सी आढळते.

**अननस** – अननस हे अतिशय चविष्ट फळ आहे. ते जितके चवदार असेल तितकेच ते व्हिटॅमिन सीने भरलेले असते. १०० ग्रॅम अननसात ४८ मिलीग्राम व्हिटॅमिन सी असते. यामध्ये अनेक प्रकारचे अँटीऑक्सिडंट असतात जे रोगांशी लढण्यासाठी उपयुक्त असतात.

**आंबा** – आंब्याला फळांचा राजा म्हटलं जातं. सध्या सर्वत्र आंब्यांचा घमघमाट आहे. आंब्यामध्ये व्हिटॅमिन सी देखील मुबलक प्रमाणात ढळते. १०० ग्रॅम आंब्यामध्ये ३६ मिलीग्राम व्हिटॅमिन सी आढळते. आंब्यामध्ये फायबरही भरपूर प्रमाणात असते.

**कीवी** – किवीला चायनीज गूसबेरी असेही म्हणतात. किवी हे एक अतिशय चवदार फळ आहे जे थोडेसे आंबट असते. त्यात ९३ मिलीग्राम व्हिटॅमिन सी आढळते. किवीमुळे रोगप्रतिकारशक्ती देखील वाढते आणि ते कोलेस्ट्रॉल देखील कमी करते.

या फळांच्या नियमित सेवनाने तुम्हाला पोषण मिळेल, व्हिटॅमिन सी चे प्रमाणही वाढेल आणि रोगप्रतिकारक शक्तीही खूप वाढेल.

## निवडक



**पाली : भाजपचे उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी यांनी पहिला पाऊस झाल्यानंतर भात पेरणी केली.**

### नेरळ येथील तरुण बेपत्ता

**चौक :** तोहिन खलील तांबोळी हा नेरळ येथील २२ वर्षाचा तरुण खोपोली शीळफाटा येथे कामावर येऊन



रेल्वेने खोपोली येथुन नेरळ स्टेशनला जाऊन हरवला आहे. तोहीन ची उंची १६० सेमी. असून बांधा सडपातळ आहे. काळे केस असून डाव्या पायात काळा दोरा बांधला आहे. त्याने अंगात राखाडी टी शर्ट व निळी जिन्स पँट घातली आहे. सोबत मँगो कलरची स्कूल बॅग आहे. पायात सफेद सँडल आहेत. या तरुणाबाबत काही माहिती आढळण्यास ७७६९०१९८६७ किंवा पोलीस हवालदार महेश खंडागळे ९२०९३०३४३५ यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

### उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन



**चौक :** विद्या प्रसारिणी सभा चौक संचलित सरनौबत नेताजी पालकर विद्यामंदिर व यशवंतराव देशमुख कनिष्ठ महाविद्यालय चौक मधील एस.एस.सी परीक्षा मार्च २०२३ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेत पहिल्या तीन क्रमांकांनी उत्तीर्ण झालेल्या नीती मंगेश कदम, हिमानी तानाजी गावडे, सिध्दी चंद्रहास बांदल या विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन यशस्वी विद्यार्थी व पालकांचे अभिनंदन करण्यात आले. या वेळी संस्थेच्या कार्याध्यक्षा शोभा देशमुख, उपकार्याध्यक्ष नरेंद्र शहा, सेक्रेटरी योगेंद्र शहा, संस्थेचे संचालक विठ्ठल कदम, शाळेचे मुख्याध्यापक श्री. भोमले, वर्गशिक्षक श्री. बडेकर, श्री. गायकवाड, श्री. वरुडे, श्री. तांबवे आदी उपस्थित होते.

### गुरुकुल संस्थेमध्ये रक्तदान दिन




**मोहोपाडा :** चौक येथील गुरुकुल येथील सर्वच विद्यार्थ्यांनी रक्तदान दिवस निमित्ताने विविध चित्र काढून रक्तदान किती महत्वाचे आहे हे या चित्राच्या माध्यमातून पटवून दिले. रक्तदान दिवस साजरा करण्यासाठी संस्थेचे संचालक प. पु. विश्वमंगलदास स्वामीजी, ब्रम्हस्वरूप स्वामीजी, मुख्याध्यापक डॉ. पी. हरीबाबु,सर्व शिक्षकवर्ग व मोठ्या संख्येने विद्यार्थी वर्ग उपस्थित होते.




**मुरूड : श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालय, नांदगाव हायस्कूल येथे शिक्षक प्रतिनिधी म्हणून अदाड गावचे रहिवासी महेश धर्मा वाडकर यांची निवड करण्यात आली. या वेळी या शाळेचे मुख्याध्यापक श्रीधर ओव्हाळ यांच्या हस्ते स्वागत करण्यात आले. त्यांच्यासमवेत प्रतीक पेडणेकर, दत्तात्रय खुळपे, मुख्य लिपिक मंगेश नांदगावकर उपस्थित होते.** (छाया : संजय करडे)

# रायगडात गुन्हेगारीच्या घटनांत वाढ

## दारूच्या नशेत सलून मालकावर प्राणघातक हल्ला


**धाटाव : प्रतिनिधी**

काहीएक कारण नसताना दारूच्या नशेत एका व्यक्तीने सलून मालकावर प्राणघातक हल्ला केल्याची घटना रोहे शहरातील अष्टमी नाक्यावर घडली आहे. या घटनेमुळे सर्वत्र खळबळ उडाली आहे.



रमेश पवार असे आरोपी व्यक्तीचे नाव असून तो खारी येथे राहत असून भुवनेश्वर येथील विजय रामचंद्र जाधव यांचे अष्टमी नाक्यावर सलूनचे दुकान आहे. गुरुवारी दुपारी विजय जाधव आपल्या सलूनमध्ये काम करता असताना आरोपी रमेश पवार हा दारूच्या नशेत असताना सलूनमध्ये येऊन दुकानात काऊंटरवर असलेला केस दाढी करण्याचा धारदार वस्तारा हातात घेऊन सलून मालक विजय जाधव यांच्यावर हल्ला केला.

अचानक झालेल्या हल्ल्याला तोंड देण्यासाठी विजय यांनी आपले दोन्ही हात पुढे केले असता झालेल्या हल्ल्यात दोन्ही हातांना गंभीर दुखापत झाली असून या प्राणघातक हल्ल्यात सलून मालक गंभीर जखमी झाले. त्यांना पुढील उपचारासाठी तातडीने रोहा उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले आहे. या प्रकरणी आरोपी रमेश पवारविरोधात पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस निरीक्षक प्रमोद बाबर यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक मनिष हिरवरकर अधिक तपास करीत आहेत.




## पोलीस असल्याची बतावणी करून एकाची चेन लांबवली

**माणगाव : प्रतिनिधी**

पोलीस असल्याची बतावणी करून ९० हजार रुपये किमतीची सोन्याची चेन चोरून अज्ञात चोरटा फरार झाल्याची घटना माणगाव तालुक्यातील वावे दिवाळी ते पोटनेर गावाच्यामध्ये अविनाश जाधव यांच्या गॅरेजसमोर घडली. याबाबतची फिर्याद हरेश्वर संभाजी शिंदे (वय ६१, रा. रातवड, ता. माणगाव) यांनी माणगाव पोलीस ठाण्यात दिली आहे.

या घटनेबाबत माणगाव पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की, घटनेतील फिर्यादी हरेश्वर संभाजी शिंदे यांना एक अनोळखी व्यक्तीने मी पोलीस असून मला सिव्हिल ड्रेसमध्ये पाहाऱ्याकरिता ड्युटीवर नेमले आहे. या ठिकाणी काल ड्रग्जची चोरी झाली आहे. म्हणून मला मोठ्या साहेबांनी इकडे पाठविले आहे, असे सांगून त्याने शिंदे यांच्याजवळ असलेले ६५०० रुपये व पॉकेट तसेच गळ्यातील सोन्याची चेन (अंदाजे किंमत ९० हजार रुपये) व त्यामध्ये श्री स्वामी समर्थचा फोटो असलेले लॉकेट काढून ते रुमालात ठेवून रुमालाला गाठी मारून रुमाल त्यांच्या जवळ दिले. नंतर दिलेला रुमाल फिर्यादी यांनी भारत पेट्रोल पंप पोटनेर येथे गेल्यावर पहिला असता त्यामध्ये फिर्यादी यांचे ६५०० रुपये व पॉकेट होते, मात्र सोन्याची चेन व त्यामधील लॉकेट मिळून आला नाही. या प्रकरणी माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सुरू आहे.

## पांगळोली येथे घरातून सोन्याची चोरी

**म्हसळा : प्रतिनिधी**

म्हसळा शहराजवळील १५ कि.मी. अंतरावरील पांगळोली गावांत माहेरवाशीण म्हणून लग्नाला आलेल्या नर्गीस मुनीर ममतुले (वय ३८, रा.वणी दापोली) या महिलेने आपले चुलते समशेर पठाण यांच्या बेडरुममधील टेबलावर ठेवलेले सोन्याचे गंथन चोरीस गेले. या संदर्भातील तक्रार म्हसळा पोलीस ठाण्यात देण्यात आली.

नर्गीस यांचे सोन्याचे गंठन सुमारे ५० हजार रुपयांचे असावे असे फिर्यादीने सांगितले. चोरीची घटना घडल्यावर तब्बल सात दिवसांनी फिर्याद नोंदविली असून आरोपीचे नावही फिर्यादीत दिले आहे. चोरीच्या घटनेची चौकशी आणि तपास म्हसळा पोलीस करीत आहेत.



## चाकूचा धाक दाखवून पाच म्हशी पळविल्या

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील मौजे खडकी आदिवासीगावात जाणाऱ्या रस्त्यावर फिर्यादी बाबू राया ढेबे रा. मालदिव शेडाशी यांच्या ताब्यातील पाच म्हशी अज्ञात चोरटयांनी चाकूचा धाक दाखवून दमदाटी करून चोरी केल्याची घटना घडली आहे.

बाबू राया ढेबे (रा.मालदेव शेडशी, पो.रानसई ता. पेण) हे गुरुवारी ८ जून रोजी रात्री खडकी आदीवासी गावात जाणाऱ्या रस्त्यावर आपल्या ताब्यातील पाच म्हशी १० :३० च्या सुमारास घेऊन जात होते. या वेळी दोन ते तीन अनोळखी आरोपी व्यक्तींनी बाबू यांना दमदाटी करून चाकूसारख्या धारदार हत्याराचा धाक दाखवून व जीवे ठार मारण्याची धमकी दिली. यानंतर त्याच्या ताब्यातील दोन लाख रुपये किमतीच्या पाच म्हशी टेम्पोतून चोरून नेल्या.

याबाबत पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असुन अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक प्रतिक पोकळे हे करीत आहेत.

## रोह्यात अमली पदार्थ विकणाऱ्याला अटक

**धाटाव, रोहे : प्रतिनिधी**

रोहा शहरात चरस, गांजा व इतर अमली पदार्थ विक्री व व्यसन करणाऱ्यांची संख्या दिवसांगणिक प्रचंडप्रमाणावर वाढली आहे. गावातील तरुण पिढी व्यसनच्या आहारी गेल्याने अनेकांचे आयुष्य उदवस्थ झाले आहेत. हे भयाण वास्तव समोर असताना काही महिन्यापूर्वी पोलिसांनी अंमली पद्धार्थ विक्रीचा बेकायदेशीर धंदा करणाऱ्यांना कायद्याचा बडगा दाखवला होता. मात्र काही दिवसानंतर परिस्थिती 'जैसे थे' असल्याने पुन्हा एकदा पोलिसांनी या गांजा माफियांविरोधात मोहीम हाती घेऊन एका गांजा विकणाऱ्या तरुणाला रंगेहाथ पकडले आहे.

अहमद सत्तार बडे (रा. रोहा, खालचा मोहल्ला) असे कारवाई केलेल्या आरोपीचे नाव असून काही महिन्यापूर्वी गांजा विक्रीसाठी नेत असताना त्याला पोलिसांनी मुद्देमाल सहित अटक केली होती. कारवाईनंतर काही काळ विश्रांती घेतल्यानंतर अहमद बडे पुन्हा एकदा अंमली पद्धार्थांची तस्करी व विक्री करत असल्याची माहिती पोलिसांना समजली. गुरुवारी गुन्हे अन्वेषण विभाग आणि रोहा पोलीस यांनी संयुक्तरित्या केल्या कारवाईत आरोपी अहमद बडे कडून ३७८ ग्रॅम वजनाचा ८७५० रुपये किंमतीचा गांजा विक्रीसाठी घेऊन जात असताना त्याला पोलिसांनी रंगेहाथ पकडले.



### वराठी रोडवर ८७५० रुपयांचा गांजा जप्त

शहरातील रोहा वराठी रोडवर रोहा पोलीस गस्त घालीत असताना एका ४५ वर्षीय व्यक्तीकडुन गांजा जप्त केला आहे. रोहा पोलीस निरीक्षक प्रमोद बाबर यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुवारी पोलीस उपनिरीक्षक धनाजी साठे, हवालदार खैरणार, चव्हाण, नाईक जाधव, शिपाई सावंत यांचे पथक रोहा वराठी मार्गावर गस्त घालत होते. या वेळी एका ४५ वर्षीय व्यक्तीकडुन ३७८ ग्राम वजनाचा अंदाजे किंमत ८७५० रुपयाचा गांजा रोहा पोलिसांनी जप्त केला आहे. या संबंधित रोहा पोलीस ठाण्यामध्ये आरोपीचे विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, रोहे शहरात अमली पदार्थ विक्री करणाऱ्यांची संख्या वाढली आहे.

## माणगाव पोलीस ठाण्यातर्फे आवाहन

**माणगाव : प्रतिनिधी**


माणगाव पोलीस ठाण्यातर्फे पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांनी नागरिकांना घडणाऱ्या काही गोष्टींबाबत जाहीर आवाहन केले आहे.

यामध्ये आवाहन करताना माणगाव पोलीस ठाण्यातर्फे पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांनी नागरिकांना सांगितले आहे की, बँक खाते, क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड यांची तपशीलवार माहिती कोणालाही शेअर करू नका. क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड अनोळखी व्यक्तीच्या हाती देऊ नका त्याचा गैरवापर होऊ शकतो. याबाबतीत टोल फ्री नंबर १९३०, साईट https://cybercrime.gov.in/ यावर संपर्क साधावा.

कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नका. धार्मिक, जातीय तेढ निर्माण करणे, जातीय सलोख्यास हानी पोहचवणे, राष्ट्रीय एकात्मतेला बाधा पोहचविणे, एखाद्या विशिष्ट समाजाला भडकवणे याबाबत सोशल मीडियावर पोस्ट करू नका, सर्व व्हाट्सअँप ग्रुप, फेस बुक, इंस्टाग्राम, टेलिग्राम यावर सायबर सेल अलिबाग हे लक्ष ठेवून आहेत. कृपया अशा प्रकारचे मेसेज, पोस्ट शेअर करून किंवा इतर कोणत्याही मार्गे धार्मिक जातीय तेढ निर्माण केल्यास संबंधितांवर कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

याबाबतीत माणगाव पोलीस ठाणे दूरध्वनी क्र ०२१४०-२६३००५ डायल ११२ या नंबरवर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## सर्वधर्मीय, सर्वपक्षीयांना शांतता राखण्याचे पोलिसांचे आवाहन



**सुधागड : रामप्रहर वृत्त**


सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोस्ट व स्टेटस यामुळे वारंवार राज्यभरात तणावाचे वातावरण निर्माण होत आहे. या घटनेचे पडसाद सुधागड तालुक्यात उमटू नयेत यासाठी पोलिसांनी शांतता कमिटीची बैठक घेण्यात आली.

सर्वधर्मियांसह सर्वपक्षीयांना शांततेचे आवाहन विश्वजीत काईंगडे यांनी केले आहे. कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी कुठेही कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलिसांनी ही खबरदारी घेतली आहे, तसेच रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या आदेशाने सर्व घडामोडी गोपनीय विभाग व सायबर क्राईम विभाग यांच्या माध्यमातून लक्ष ठेवून आहे, असे त्यांनी सांगितले. या वेळी राजेंद्र राऊत, अलाप मेहता, पाली मुस्लिम समाज अध्यक्ष सलाम पानसरे, इम्तियाज पठाण, विक्रांत चौधरी, रोहन दगडे, अनिस अनिश खानदेशी, अश्फाक खानदेशी, पप्पू पलबळकर उपस्थित होते.

## जिल्हा नियोजन समिती सदस्यपदी निलेश घाटवळ

**रेवदंडा :** मुरूड तालुक्यातील सर्वपरिचीत बारशिव गावचे रहिवाशी निलेश घाटवळ यांची जिल्हा नियोजन समिती सदस्यपदी निवड जाहीर झाली आहे. त्यांच्या निवडीचे मुरूड-अलिबाग विधानसभा आमदार महेंद्र दळवी यांनी नुकतेच शुभेच्छा प्रदान केल्या असून त्यांचेवर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

मुरूड तालुक्यात राजकीय, सामाजीक, क्रिडा, आरोग्य, सांस्कृतिक, शैक्षणिक क्षेत्रात अग्रक्रमाने निलेश घाटवळ यांचे नाव घेतले जाते, बारशीव गावचे रहिवाशी असून सुध्दा संपुर्ण मुरूड तालुक्याला ते परिचीत आहेत. जिल्हा नियोजन समिती सदस्य म्हणून ते क्रियाशीलपणे काम करतील असा विश्वास आमदार महेंद्र दळवी यांनी व्यक्त केला असून त्यांचे कार्यकर्त्यांनीसुध्दा आनंद व्यक्त केला आहे.




### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, आमचे अशील खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत जमीन मालक लक्ष्मीबाई जेठू पाटील व इतर यांचे कडून विकत घेण्याचा विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे भेरले, तालुका पनवेल, जिल्हा रायगड,**

| सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| 1) 91 | 1 | 0- 14 - 70 | 2 रु. 44 पै. |
| | पो.ख. | 0- 02 - 00 | |
| | एकूण | 0- 16 - 70 | |

वरील वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापूर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ, अथवा, अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यावर '7' दिवसांच्या आत' आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहित व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशील सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे, आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरून सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

सही/-
**ॲड. विजय रामराव सुरडकर,**
पनवेल
दि. 17/06/2023
**पत्ता :**४०३,श्री. आराधना कॉ.ऑप. होऊ. सोसा.,से-५,प्लॉट नं .३६, सानपाडा ,नवी . मुंबई :४००७०५, **फो :9870099284**


## भावशेत ठाकूरवाडी येथे आरोग्य शिबिर

**पाली : प्रतिनिधी**

स्वदेस फाउंडेशनचे संचालक राहुल कटारिया यांच्या पुढाकाराने सुधागड तालुक्यातील भावशेत ठाकूरवाडी येथे आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात पुणे येथील डॉ. सुरभी धनवाला यांनी गावातील सर्व गटातील लोकांना सांधेदुखी, पाठदुखी आणि सांधेदुखीच्या इतर समस्यांवर मार्गदर्शन केले.

डॉ. सुरभी धनवाला पुण्यातील फिजिओथेरपिस्ट आणि निसर्गोपचारतज्ज्ञ आहेत. त्यांना सकाळ आयडॉल ऑफ महाराष्ट्र २०२२, भारत भूषण पुरस्कार २०२२, सेवा रत्न इत्यादींनी सन्मानित केले आहे. अनेक लोक विशेषत: रोजंदारीवर काम करणारे कामगार सांधेदुखीच्या समस्येने त्रस्त होते. डॉ.सुरभी धनवाला यांनी चांगले मार्गदर्शन केले व सोप्या व्यायामाच्या पद्धती सांगितल्या. यासोबतच काही शिबिरार्थींचे मसाज केले.



(छाया : धम्मशील सावंत)

शिबिरासाठी आजूबाजूच्या गावातील ग्रामस्थांनीही सहभाग घेतला होता. शिबिराचा फायदा सर्व ग्रामस्थ, गाव विकास समिती सदस्यांना झाला. त्याबद्दल त्यांनी स्वदेस फाउंडेशनचे संचालक राहुल कटारिया व डॉ. सुरभी धनवाला यांचे आभार मानले. ग्रामस्थांबरोबरच स्वदेस फाउंडेशनच्या सुधागड तालुक्यामधील नागरिक व कार्यकर्त्यांनी या शिबिराचा फायदा घेतला.

## शासनाच्या रोजगार मेळाव्याला प्रतिसाद

**अलिबाग : जिमाका**

शासन आपल्या दारी या उपक्रमांतर्गत जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, रायगड-अलिबाग यांच्यामार्फत २७ मे २०२३ रोजी श्री समर्थ मंगल कार्यालय, खोपोली येथे पंडित दीनदयाळ उपाध्याय महारोजगार मेळावा घेण्यात आला होता.

या मेळाव्यात एकूण ३५ उद्योजकांनी सहभाग नोंदवून एक हजार ५०५ रिक्तपदे अधिसूचित केली होती. या रोजगार मेळाव्यास एकूण ५५२ बेरोजगार युवक-युवतींनी सहभाग नोंदविला होता. तिथे उपस्थित विविध नामांकित कंपनीच्या उपस्थित प्रतिनिधीकडे ८३९ उमेदवारांनी मुलाखती दिल्या होत्या. त्यामध्ये २४४ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली होती. तसेच ८ जून २०२३ रोजी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र व जन शिक्षण संस्था रायगड यांच्यावतीने शासन आपल्या दारी व G20 जन भागीदरी या उपक्रमांतर्गत रोहा येथील स्वामी विवेकानंद ट्रेनिंग इन्स्टिट्यूट मध्ये मार्गदर्शन सत्र घेण्यात आले होते. या सत्रास ७० महिला व इतर उमेदवारांनी उपस्थिती नोंदविली होती. स्वयंरोजगार करु इच्छिणाऱ्या उमेदवारांना आण्णासाहेब पाटील अर्थिक विकास महामंडळ मर्या.कर्ज योजना व कौशल्य विकासातून रोजगार व स्वंयरोजगार व स्टार्टअप या विषयीची माहिती देण्यात आली.

त्यानंतर १५ जून २०२३ रोजी ऑनलाईन झाला व शनिवार २४ जून २०२३ रोजी सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत पनवेल-उरण आगरी समाज मंडळाचे महात्मा फुले सभागृह, पनवेल येथे पंडीत दिनदयाळ महारोजगार मेळावा ऑफलाईन आयोजित केला आहे, असे कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रांच्या सहाय्यक आयुक्त अ. मु. पवार यांनी कळविले आहे.


### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळवीण्यात येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत जमीन मालक श्री. दिलीपकुमार फतेहलाल खेरोदीया व इतर यांचेकडून विकत घेण्याच्या विचारात आहे. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणेः

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे - विहीघर, तालुका - पनवेल, जिल्हा - रायगड**

| सर्व्हे / गट नं | हिस्सा नं. | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रु.- पै. |
|---|---|---|---|
| १) ५७ | १ | - ० हे - ७१ आर - ६० पॉ. | ७ - ७५ |
| | पो. ख. | - ० हे - ०२ आर - ०० पॉ. | |
| | एकूण क्षेत्र | - ० हे - ७३ आर - ६० पॉ. | |

वरील वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापूर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ, अथवा, अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यावर '१४' दिवसांच्या आत' आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहित व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशील सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे, आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरून सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

सही/-
**ॲड. विजय रामराव सुरडकर,**
ठि.: पनवेल
दि. 17/06/2023
**पत्ता :**४०३,श्री. आराधना कॉ.ऑप. होऊ. सोसा.,से-५,प्लॉट नं .३६, सानपाडा ,नवी . मुंबई :४००७०५, **फो :9870099284**

# उंबरविरा ठाकूरवाडीला नागरी सुविधांची प्रतीक्षा

## पुनर्वसन करण्याची आदिवासी बांधवांची मागणी

**खालापूर : प्रतिनिधी**

खालापुरातील उंबरविरा ठाकूरवाडीत नागरी सुविधांचा अभाव असून मागील आठ महिने विद्युत पुरवठा अनियमित होत आहे. त्यामुळे त्रस्त झालेल्या ग्रामस्थांनी आम्हाला नागरी सुविधा द्या किंवा संपूर्ण वसाहत स्थलांतरित करून विकास करा, अशी मागणी केली आहे.

नियोजित जांबरुंग धरणांच्या उशाशी असणाऱ्या अतिदुर्गम भागातील उंबरविरा ठाकूरवाडी विकासापासून वंचित आहे. ठाकूरवाडीत वीज नाही, पाणी नाही, रस्ता नाही, शिक्षण नाही, आरोग्याची बोंबाबोंब, ना रोजगार, तसेच शासकीय योजना आदिवासी बांधवांपर्यंत पोहोचल्याच नाही. हाताला काम नसल्याने आम्ही



जगायचे कसे? असा सवाल महिलांनी खालापूर तहसीलदार आयुब तांबोळी, गटविकास अधिकारी अधिकारी बालाजी पुरी यांना भेटून केला. गावातील विद्युत पुरवठा करणारे ट्रान्स्फॉर्मर मागील आठ महिन्यांपासून बंद आहे. वाडीत लाईट नाही, आम्ही शेळ्या, मेंढ्या, कोंबड्यांचे जीवन जगायचे का? असा प्रश्न अभियंता गायकवाड यांना केला. नागरी सुविधा द्या अन्यथा आमचे पुनर्वसन कुठेही करा, अशा मागण्यांचे निवेदन आदिवासी बांधवांनी खालापूर तहसीलदार आयुब तांबोळी यांना दिले.

तहसीलदार आयुब तांबोळी यांनी आपल्या मागण्या सकारात्मक आहेत. वरीष्ठ पातळीवर पाठपुरावा केला जाईल असे आश्वासन दिले, तर विजपुरवठा काही दिवसांतच सुरळीत करू असे आश्वासन विज वितरण कंपनीचे गायकवाड यांनी दिले. या वेळी नारायण निरगुडा, राम सुतक, रवी बांडाडे, बाळु निरगुडा, राम शिंगवा, दामा धारवडा, दिलीप भांगारे, लक्ष्मण पारधी, परशुराम साभरा, सुरेश सांगाडे व आदिवासी बांधव उपस्थित होते.

# स्मशानभूमीसाठी म्हात्रोळी ग्रामस्थांचा उपोषणाचा इशारा

**अलिबाग : प्रतिनिधी**

म्हात्रोळी गावचा स्मशानभूमीचा प्रश्न रखडला आहे. स्मशानभूमीसाठी समाजक्रांती आघाडी संघटनेच्या मार्गदर्शनाखाली ग्रामस्थांनी उपोषणाचा इशारा दिला आहे.

म्हात्रोळी गावासाठी सारळ ग्रामपंचायत हद्दीतील गट नं. १७७, जुना गट नं. २६०, क्षेत्र ०.०७.०० हे.आर. स्मशानभूमीसाठी राखीव आहे, परंतु या राखीव जागेत स्मशान चौथरा बांधण्यासाठी शासनाकडून लेखी परवानगी व पोलीस संरक्षण मिळत नाही. त्यामुळे नाईलाजाने आपल्याला आमरण उपोषण करावे लागणार असल्याची माहिती ग्रामस्थांनी पत्रकार परिषदेत बोलताना दिली.

म्हात्रोळी हे गाव डोंगराच्या कुशीत वसले आहे. गावात एखाद्याचे निधन झाले, तर त्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यासाठी तीन किमी अंतरावरील सारळ स्मशानभूमीत चालत जावे लागते. प्रत्येक गावात स्मशानभूमी असणे हे आवश्यक आहे. स्मशानभूमीचा चौथरा बांधण्यासाठी सारळ ग्रामपंचायतीने यापूर्वी ठराव मंजूर केला आहे. ७/१२वरही चौथऱ्यासाठी राखीव अशी नोंद आहे. एवढेच नव्हे तर स्मशानभूमीचा चौथरा बांधण्याचा खर्च ग्रामस्थ करण्यास तयार आहेत, परंतु स्मशानभूमीचा चौथरा बांधताना विरोध होण्याची शक्यता लक्षात घेऊन कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. त्यामुळे शासनाची लेखी परवानगी अपेक्षित आहे. त्याबरोबरच पोलीस संरक्षणही आवश्यक आहेल मात्र अद्याप शासनाने आपल्या मागणीची कोणतीच दखल घेतली नाही. त्यामुळे उपोषण आंदोलन करावे लागत आहे, असे ग्रामस्थांनी सांगितले. मागणीची गांभीर्याने दखल न घेतल्यास समाजक्रांती आघाडी संघटनेच्या मार्गदर्शनाखाली १९ जूनपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण करणार असल्याचे निवेदन ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी व पोलीस अधिकाऱ्यांना दिले आहे.

# अक्षय भालेराव हत्येप्रकरणी कर्जतमध्ये आरपीआयचा मोर्चा

**कर्जत : प्रतिनिधी**

नांदेड जिल्ह्यातील बोढार गावातील अक्षय भालेराव या तरुणाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त मिरवणूक काढली म्हणून त्याची हत्या करण्यात आली. त्या तरुणाच्या हत्येच्या निषधार्थ कर्जत येथे आरपीआय आठवले गटाच्या वतीने मोर्चा काढण्यात आला.



नांदेड जिल्ह्यातील बोढार गावात विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी केल्याचा राग मनात धरून त्याच गावातील गावगुंडानी अक्षय भालेराव या तरुणाची हत्या केली, तसेच अक्षयच्या आई आणि भावालाही दगडाने मारहाण केली. नंतर बौद्ध वस्तीवर दगडफेक करत हल्ला करून दहशत निर्माण केली. मुंबई येथील वसतिगृहात शिकणारी तरुणीवर अत्याचार करणाऱ्यावर कारवाई व्हावी. या मागणीसाठी कर्जत तहसील कार्यलयावर मोर्चा काढण्यात आला. डॉ बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथून मोर्चा पोलीस ठाणे येथे पोहचला.

तालुकाध्यक्ष हिरामण गायकवाड यांनी पोलीस निरीक्षक के. डी. कोल्हे यांना निवेदन दिले. त्यावेळी तालुका सचिव अनंता खंडागळे,तालुका उपाध्यक्ष प्रकाश गायकवाड, किशोर गायकवाड, अंकुश सुरवसे, सहसचिव जिवक गायकवाड, तालुका युवक अध्यक्ष जाधव, महिला तालुकाध्यक्ष वर्षा चिकणे, सुनीता चव्हण आदी उपस्थित होते.

# दरडग्रस्त केवनाळे, साखर सुतारवाडीची तहसीलदारांकडून पाहणी

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील २०२१मधील दरडग्रस्त केवनाळे आणि साखर सुतारवाडी या गावांच्या पुनर्वसनाच्या सद्यस्थितीची पाहणी नवनियुक्त तहसीलदार कपिल घोरपडे यांनी केली.

केवनाळे येथे अतिवृष्टीमुळे साखर-सुतारवाडी येथील घरांवर दरड कोसळून जिवित्तहानी झालेली आहे. यामध्ये चार बाधित कुटूंबांपैकी पाचजण मृत झाले. सहाजण जखमी झाले तर १७ जनावरे मृत झाली. याठिकाणी जेएसडब्ल्यू कंपनीच्या सात कन्टेनरमध्ये पुनर्वसन करण्यात आले आहे. साखर सुतारवाडी येथे भूसंपादनासाठी ६४ लक्ष २८ हजार १४८ रूपये शासनाकडून प्राप्त झाले असून दोन लाख ५० हजार ८७० रूपये कन्टेनरसाठी चौथरा उभा करण्यासाठी आणि नळपाणीपुरवठा योजनेसाठी दोन लाख ७९ हजार ८२१ रूपये खर्च करण्यात आले. या वेळी देवळेचे अनिल दळवी हे



उपस्थित होते. केवनाळे येथे १२८ घरांचे पुनर्वसन करण्याची आवश्यकता असून जिऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडियातर्फे यांच्या अहवालानुसार ३-७६-९१ हे.आर. क्षेत्राची सक्तीच्या भुसंपादनासाठी शिफारस करण्यात आली आहे.



साखर सुतारवाडीमध्ये सहा मृत झाले. १२ घरे पुर्णत: आणि १० घरे अंशत बाधित असून सुतारवाडी येथे ३८ घरांचे ४४ कुटूंबांचे पुनर्वसन करण्याची आवश्यकता आहे. सुतारवाडी येथे कायमस्वरूपी पुनर्वसनाकामी साखर सुतारवाडी येथे भूसंपादनासाठी ३८ लक्ष ४१ हजार ७८६ रूपये शासनाकडून प्राप्त झाले असून दोन लाख ५४ हजार ८७० रूपये कन्टेनरसाठी चौथरा उभा करण्यासाठी आणि नळपाणीपुरवठा योजनेसाठी दोन लाख ५४ हजार ८७० रूपये खर्च करण्यात आले. खासगी मालकांच्या संमतीने १-८४-०० हेक्टर आर या क्षेत्राचे निश्चिती करण्यात आली पण ती जीएसआयच्या सर्व्हेनुसार नाकारण्यात आली. जिऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडियातर्फे यांच्या अहवालानुसार ०२-२७-९० हे.आर. क्षेत्राची सक्तीच्या भूसंपादनासाठी शिफारस करण्यात आली.



(छाया : राकेश खराडे)

# चौकमध्ये शाळा सुरू

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

चौक प्राथमिक विद्यामंदिर व शिशुमंदिरमध्ये शाळा प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला. विद्या प्रसारिणी सभा चौकच्या कार्याध्यक्ष व प्राथमिक विद्यामंदिर व शिशुमंदिराच्या अध्यक्ष शोभा देशमुख यांनी विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प व चॉकलेट देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत केले तसेच विद्या प्रसारिणी सभा चौकचे सेक्रेटरी योगेंद्रजी शहा यांनीही विद्यार्थ्यांना चॉकलेट देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत केले.

या कार्यक्रमास मुख्याध्यापिका सुलभा गायकवाड, समन्वयक देवानंद कांबळे, चेतन मालुसरे उपस्थित होते. या वेळी शाळेत उत्साहाचे वातावरण होते. नवीन वर्ग, दप्तर, पुस्तके यामुळे विद्यार्थी आनंदी होते. लहान मुलांच्या किलबिलाटाने शाळेतील वातावरण आनंदी झाले.

# मजगाव शाळेत प्रवेशोत्सव सोहळा

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यात आदर्श शाळा म्हणून लौकिक मिळविलेल्या मजगाव शाळेत नवागत विद्यार्थ्यांचे नव्या शैक्षणिक वर्षात स्वागत करण्यासाठी शाळा प्रवेशोत्सव कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

या वेळी तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी सुनील गवळी यांनी मार्गदर्शन करताना म्हटले की, शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांनी आनंदाने धडे शिकवावेत यासाठी शाळा प्रवेशोत्सव कार्यक्रम राबविला जातो. शिवसेना नेते अमित कोळी यांनी मार्गदर्शन करताना म्हटले की, शाळेसाठी प्रशस्त नवीन इमारत बांधून देण्यासाठी योगदान देऊ. योगेंद्र गोयजी यांनी शाळेच्या गुवत्तेसाठी शिक्षकांना सर्व प्रकारचे सहकार्य करणार असल्याचे सांगितले. या प्रवेश सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके, गणवेश यांचे वितरण करण्यात आले.



(छाया : संजय करडे)

कार्यक्रमास शाळा व्यवस्थापन समितीचे निखिल मानाजी, उमेश कोंडाजी, रूपेश अंबाजी, रूपेश पाके हे सदस्य उपस्थित होते.

कार्यक्रमाचे नियोजन मुख्याध्यापक हेमकांत गोयजी यांनी केले होते. मनीषा वाघरे, हर्षा नांदगावकर व प्रमिला फुंदे यांनी औक्षण व पुष्पगुच्छ देऊन नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत केले. सूत्रसंचालन चेतन चव्हाण यांनी केले, तर आभार रंजिता केमकर यांनी मानले.

# नागोठणे शाळेत विद्यार्थ्यांचे स्वागत

**नागोठणे : बातमीदार**

कोएसोच्या नागोठणे येथील अमरचंद जेठमल जैन मराठी प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांचे व पालकांचे शाळेच्या पहिल्या दिवशी स्वागत करण्यात आले.

या वेळी शाळा समितीचे अध्यक्ष अनिल काळे, सदस्य जयराम पवार, मुख्याध्यापिका राजश्री शेवाळे, शिक्षिका अनघा लोखंडे, विजया पिंगळे, पालकवर्ग, विद्यार्थी उपस्थित होते. या वेळी काळे व सदस्य पवार यांनी विद्यार्थ्यांचे औक्षण करून त्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. त्यानंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सरकारी पाठ्यपुस्तके विद्यार्थ्यांना वितरीत करण्यात आली.



(छाया : श्यामकांत नेरपगार)

# कर्जतमध्ये शाळा भरली

**कर्जत : प्रतिनिधी**

दीड ते दोन महिन्यांच्या कालावधीनंतर गुरुवारी (दि.१५) शाळेच्या घंटा वाजल्या. शाळेचा पहिलाच दिवस असल्याने विद्यार्थ्यांमध्ये उत्साह, आनंद दिसत होता.

शाळेचा पहिला दिवस काही पालक मुलांना सोडायला आले होते. मुलांच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता. शाळेत येताना नवा गणवेश, नवे दप्तर, नवे बूट परिधान केले होते. नवा वर्ग कसा असेल, नवीन मित्रमैत्रिणींची ओळख, वर्ग शिक्षक कोण असणार याची मोठी उत्सुकता विद्यार्थ्यांच्या



चेहऱ्यावर दिसत होती.

दीड ते दोन महिने शाळेचा परिसर ओस पडला होता. गुरुवारी शाळेला सुरुवात झाल्याने शाळेचा परिसरात पुन्हा विद्यार्थीची किलबिल ऐकू यायला लागली. रस्त्यावर पालकांची गर्दी दिसू लागली. रजेवर गेलेल्या स्कूल बस रस्त्यावर पुन्हा धावू लागल्या आहेत.

# 'गेल'मधील महिलांना स्वसंरक्षणाचे धडे

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

महिलांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याच्या दृष्टीने गेल इंडिया लिमिटेड उसरच्या माध्यमातून व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, प्रिझम सामाजिक विकास संस्थेच्या सहकार्याने कंपनीमधील महिला कर्मचारी त्याचबरोबर आजूबाजूच्या गावातील बचत गटातील महिलांकरिता पाच दिवसीय स्वसंरक्षण प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन कंपनीचे मुख्य महाप्रबंधक व प्रभारी अधिकारीअनुप गुप्ता गेल उसर, मानव संसाधन विभाग महाप्रबंधक जितिन सक्सेना, एलविना आईजक मुख्य प्रबंधक (मानव संसाधन) यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. या प्रशिक्षण शिबिरात सहभागी झालेल्या महिलांना ज्युदो, कराटे, योगा, आरोबिक्स व विविध स्वसंरक्षण टेक्निक शिकविण्यात आले. प्रशिक्षण तपस्वी नंदकुमार गोंधळी, योग प्रशिक्षण श्रीअंबिका योग कुटीरच्या प्रशिक्षिका माधवी पवार यांनी दिले, तर स्वयंसिध्दा प्रशिक्षिका शितल सुधीर म्हात्रे, अश्विनी जानू पारधी, स्नेहा संदीप मानकर, श्रावणी राऊत यांनी सहकार्य केले.

या वेळी वरिष्ठ प्रबंधक मृणालिनी चावरे, वरिष्ठ अधीक्षक (मानव संसाधन) सुजन ठाकूर, अधिकारी (मानव संसाधन) सुलोचना एन. पाटील, वरिष्ठ अभियंता (पीडीएचपीपी परियोजना) साहिती कंटेवारी, सायली माळवी उपस्थित होते.



# सार्वजनिक ग्रंथालय कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण

**म्हसळा : प्रतिनिधी**

रामभाऊ म्हाळगी प्रबोधनीच्या वतीने ८ व ९ जुलै रोजी राज्यातील सार्वजनिक ग्रंथालय कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. हे प्रशिक्षण उपयुक्त ठरणार असल्याचे रायगड जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष संजय बांदार्डे यांनी म्हटले आहे.

ग्रंथालय कर्मचाऱ्यांना राज्य शासनाकडून नव्याने मिळालेली वेतनवाढ व त्या अनुषंगाने बदलती कार्यपद्धती आणि कामकाज यासाठी प्रशिक्षण कार्यशाळा महत्त्वाची ठरणार आहे. विविध अंगी तज्ज्ञ मंडळींचे मार्गदर्शन या वेळी होणार आहे. सर्व वर्गातील ग्रंथालयांच्या कर्मचाऱ्यांसाठी उपयुक्त ठरणारी ही कार्यशाळा ८ आणि ९ जुलै रोजी सकाळी १० ते सायं ५ वाजेपर्यंत रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीने आयोजित केली आहे.


## जाहीर सुचना

दि पनवेल को-ऑपरेटीव्ह अर्बन बँक लि. पनवेल बँकेच्या सर्व सभासद आणि ठेवीदार यांना सूचित करण्यात येते की, ज्या सभासदांनी व ठेवीदारांनी के.वाय.सी (K.Y.C.) ची पूर्तता केलेली नाही त्यांनी सदर पूर्तता करून सहकार्य करावे. त्याकरीता फोटो पॅनकार्ड व आधारकार्ड ई. बँकेच्या शाखेमध्ये सादर करावे, तसेच जे सभासद व ठेवीदार मयत झाले आहेत त्यांच्या वारसांनी बँकेशी संपर्क करून त्यांचे वारस नोंद करून घ्यावे. जे सभासद मयत झालेले आहेत त्यांची वारस नोंद केली नाही तर सदर मयत सभासदाचे सभासदत्व कमी करण्यात येईल.

तसेच ज्या सभासद व ठेवीदार यांचा सध्याचा पत्ता, मोबाईल नंबर यामध्ये बदल झाला असल्यास त्याची माहिती बँकेमध्ये सादर करून पूर्तता करावी.

**सही/-**
**व्यवस्थापक**
**दि पनवेल को-ऑप अर्बन बँक लि**

**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered contractors on MAHATRANSCO E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender Specification:

| RFx No. | Description | Estimated Cost |
|---|---|---|
| Tend-14/ 23-24 **7000027507** | Supply of Safety Shoes of various sizes under EHV (O&M) Circle, Panvel. | Rs. 4.63 Lakh |
| Tend-15/ 23-24 **7000027525** | Supply of Rain Suit of various sizes under EHV O&M Circle, Panvel for the block year 2023-26. | Rs. 3.62 Lakh |

**EMD:** 1% of Estimated Cost **Submission of Bids:** From 16.06.2023 to 23.06.2023 up to 11:00 Hrs **Opening Date:** 23.06.2023 @ 11:30 Hrs. **Tender Fee:** Rs. 500/- + GST for each Tender. For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in/ Contact Person:** The Executive Engineer (Adm) Tel. No. 022-27459624, Mob. No. 9167026141 e-mail **ID: se7200@mahatransco.in**

**Sd/-**
**Superintending Engineer**
**EHV (O&M) Circle, Panvel**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

मौजे-कोप्रोली, ता. उरण, जिल्हा रायगड येथील खालीलप्रमाणे वर्णन केलेली जमीन मिळकत **श्री. सत्यवान बाबू पाटील व श्री. सुभाष बाबू पाटील** यांचे सामाईक मालकी हक्काची व ताबेकब्जा वहिवाटीची जमीन मिळकत आहे. सदर जमीन मिळकतीचे सविस्तर वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे- कोप्रोली, ता. उरण, जि. रायगड.**

| जमीन धारकाचे /भोगवटादाराचे नांव | भूमापन क्र./ सर्वे नं. | उपविभाग/ हिस्सा न. | क्षेत्र हे. आर. पॉ. (चौ.मी.) | बिनशेती आकाराची रु. पै. |
|---|---|---|---|---|
| श्री. सत्यवान बाबू पाटील श्री. सुभाष बाबू पाटील | २१ | ३/ब/१ | ०-१४-३० पो.ख. ०-००-०० | २.६८ |

सदर जमीन मिळकत. आमच्या अशिलांनी कायम खरेदीने विकत घेण्याचे ठरविलेले आहे. सदरची मिळकत हि निर्वेध व बोजारहीत असल्याबद्दल विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना भरवसा दिलेला आहे.

तरी सदर मिळकत वा तिचे कोणतेही भागावरती कोणाचाही कोणाताही, कसलाही कुळ वहिवाट, बाताकब्जा, बयाण पावती, वचनचिठ्ठी, साठेकरार, खरेदीखत, गहाण, बोजा पोटगी, चार्ज, मॉर्टगेज, संपादन, भाडेपट्टा, इजमेंट, ॲटॅचमेंट, मृत्यूपत्रांकीत दान, कर्ज, लिज, तबदील, ट्रस्ट, वारसा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबंध असल्यास हि नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप स्पष्ट करुन आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यांसह खालील सही करणार यांचे तत्वावर लेखी स्वरुपात आपल्या हरकती रजिस्टर पोष्टाने व समक्ष भेटून दाखल कराव्यात.

याप्रमाणे दिलेल्या १५ दिवसांच्या मुदतीत हरकती न आल्यास वरील मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे, तसेच सदर मिळकतीवर कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबध नाही व असल्यास तो जाणीवपूर्वक सोडून दिला आहे असे गृह धरुन आमचे अशिल सदर मिळकतीचा कायम खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर आलेल्या कोणत्याही तक्रारी, हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. तसेच परस्पर वर्तमानपत्रात घेतलेली हरकत सुध्दा आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्व लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

दिनांक :- १७/०६/२०२३

**सही/-**
**ॲड. शिवराज गणपतराव राणे**
ॲडव्होकेट हायकोर्ट - मो.नं. ९८६९२०५०१३/८३६९४७९५३७
पत्ता :-'सावली' रो-हाऊस, प्लॉट-अे/२१, सेक्टर- ६, नवीन पनवेल - ४१०२०६

# ‘पुणेरी बाप्पा’चा विजयी श्रीगणेशा

## एमपीएलमध्ये कोल्हापूर टस्कर्सवर दणदणीत विजय

**पुणे : प्रतिनिधी**

महाराष्ट्र प्रीमियर लीगमध्ये गुरुवारी झालेल्या सामन्यात पुणेरी बाप्पा संघाने आठ गडी राखून विजय मिळवला. सामन्यात प्रथम फलंदाजी करताना कोल्हापूर टस्कर्सने सात बाद १४४ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात पुणेरी बाप्पा संघाने दोन गडी गमावून १४.१ षटकांत १४५ धावा केल्या.

कोल्हापूरने दिलेल्या १४५ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना ऋतुराज गायकवाड आणि पवन शाह यांनी वादळी सुरुवात केली. दोघांनी चौफेर फटकेबाजी करीत पुण्याची धावसंखेला आकार दिला. १० षटकांत दोघांनी ११० धावांची सलामी दिली. या जोडीपुढे कोल्हापूरचे गोलंदाज फिके वाटत होते. ऋतुराजने २७ चेंडूंत ६४ धावांची वादळी खेळी केली. या खेळीत ऋतुराजने पाच चौकार आणि पाच षटकारांचा पाऊस पाडला, तर पवन शाह याने ४८ चेंडूंत ५७ धावांची खेळी केली. यामध्ये सहा चौकार आणि एका षटकाराचा समावेश होता. सलामीची जोडी माघारी परतल्यानंतर सुरज शिंदे आणि यश क्षीरसागर यांनी पुण्याला विजय मिळवून दिला. सुरज शिंदेने ११ धावा केल्या. कोल्हापूरकडून श्रेयस चव्हाण आणि तरणजीत सिंह यांनी प्रत्येकी एक एक विकेट घेतली.



तत्पूर्वी, टस्कर्स संघाने २० षटकांत ७ बाद १४४ धावांची मजल मारली होती. केदार जाधव (२२ चेंडूंत २५ धावा, तीन चौकार, एक षटकार) आणि अंकित बावणे यांनी कोल्हापूर संघाला दमदार सलामी दिली. रोहन दामले याने केदारला बाद करुन ही जोडी फोडली. त्यानंतर मैदानात उतरलेला एमपीएलमधील सर्वात महागडा खेळाडू नौशाद शेख २४ चेंडूंत केवळ २० धावा करून तंबूत परतला. त्यानंतर कोल्हापूरचा डाव २ बाद ११९ वरून अखेर ७ बाद १४४ घसरला. पुणेरी बाप्पाकडून पियूष साळवी (३-१८) आणि सचिन भोसले(३-४०) यांनी प्रत्येकी तीन बळी घेतले.

दरम्यान, ऋतुराज गायकवाड या सामन्यात पत्नीची १३ क्रमांकाची जर्सी घालून मैदानात उतरला होता. ऋतुराज अनेकदा ३१ क्रमांकाच्या जर्सीत दिसलाय, मात्र या वेळी तो १३ क्रमांकाची जर्सी परिधान करून खेळताना दिसला. त्याची पत्नी उत्कर्षादेखील एक क्रिकेटर आहे आणि तिचा जर्सी नंबर १३ आहे.

### इंडोनेशिया खुली बॅडमिंटन स्पर्धा

# श्रीकांत, प्रणॉयची आगेकूच; सिंधूचे आव्हान मात्र संपुष्टात

**जकार्ता : वृत्तसंस्था**

भारताच्या किदम्बी श्रीकांतने आपलाच सहकारी लक्ष्य सेनवर मात करीत इंडोनेशिया खुल्या बॅडमटन स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली. एचएस प्रणॉयलाही आगेकूच करण्यात यश आले. पी. व्ही. सिंधूचे आव्हान मात्र संपुष्टात आले.

उपउपांत्यपूर्व फेरीच्या लढतीत श्रीकांतने आपल्या अनुभवाचा पुरेपूर फायदा घेत लक्ष्यचे आव्हान २१-१७, २२-२० असे परतवून लावले. श्रीकांत आणि लक्ष्य यांच्यात कमालीची चुरस झाली, मात्र दोन्ही गेममध्ये महत्त्वाच्या क्षणी श्रीकांतने संयमाने खेळ करत लक्ष्यवर विजय मिळवला.श्रीकांतची गाठ आता चीनच्या ली शी फेंगशी पडणार आहे. सातव्या मानांकित प्रणॉयने ४३ मिनिटांत हाँगकाँगच्या अँन्गस एन्ग का लोंगवर २१-१८, २१-१६ अशी सहज मात केली. प्रणॉयसमोर आता जपानच्या तिसऱ्या मानांकित कोडाई नाराओकाचे आव्हान असेल.




महिला एकेरीत सिंधूला मात्र पुन्हा एकदा दुसऱ्याच फेरीतून आव्हान गमवावे लागले. जागतिक क्रमवारीत तिसऱ्या स्थानावर असणाऱ्या ताय झु यिंगने सिंधूचा २१-१८, २१-१६ असा पराभव केला. सिंधूला गेल्या दोन स्पर्धांमध्ये पहिल्या फेरीचाही अडथळा पार करताना आला नव्हता. या वेळी सिंधूचे आव्हान दुसऱ्या फेरीत संपुष्टात आले. आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रत्येक वेळी ताय झु यिंगने सिंधूसमोर आव्हान उभे केले. ही लढतही त्याला अपवाद ठरली नाही.

पुरुष एकेरीत भारताच्या प्रियांशू राजावतला कडव्या प्रतिकारानंतर जागतिक क्रमवारीतील दुसऱ्या स्थानावरील अँन्थनी गिंटिंगकडून २२-२०, १५-२१, १५-२१ अशी हार पत्करावी लागली.

पुरुष दुहेरीत सात्विकसाईराज रंकीरेड्डी-चिराग शेट्टी जोडीनेही उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. सात्विक-चिराग जोडीने चीनच्या हे जी टिंग-झोऊ हाओ डॉन्ग जोडीचा २१-१७, २१-१५ असा पराभव केला. भारतीय जोडीची गाठ आता अव्वल मानांकित फजर अल्फियान-मोहम्मद रियान आर्डीआण्टो जोडीशी पडणार आहे.

# रायुडू आणि ब्राव्हो टेक्सास सुपर किंग्जकडून खेळणार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

मेजर लीग क्रिकेट स्पर्धेला १३ जुलैपासून सुरुवात होणार आहे. या स्पर्धेत चेन्नई सुपर किंग्ज फ्रँचायझी टेक्सास सुपर किंग्जमध्ये चेन्नईचे स्टार अंबाती रायुडू आणि ड्वेन ब्राव्होसह अनेक खेळाडू सहभागी होणार आहेच. आयपीएल २०२३ नंतर, अंबाती राडूने स्पर्धेतून निवृत्तीची घोषणा केली, तर ड्वेन ब्राव्हो या हंगामात संघाचा गोलंदाजी प्रशिक्षक होता. त्याचवेळी, हे दोन्ही खेळाडू या वर्षी अमेरिकेत खेळल्या जाणाऱ्या मेजर लीग क्रिकेटमध्ये खेळताना दिसणार आहेत.



ब्राव्हो आणि रायुडू व्यतिरिक्त, चेन्नईचे उर्वरित स्टार खेळाडू डेव्हॉन कॉनवे आणि मिचेल सँटनर देखील मेजर लीग क्रिकेटच्या पहिल्या सत्रात टेक्सास सुपर किंग्जकडून खेळतील. त्याचवेळी, चेन्नईच्या खेळाडूंशिवाय गुजरात टायटन्सचा फलंदाज डेव्हिड मिलरचाही टेक्सास सुपर किंग्ज संघात समावेश करण्यात आला आहे. त्याचबरोबर चेन्नई सुपर किंग्जचे मुख्य प्रशिक्षक स्टीफन फ्लेमिंग हे देखील टेक्सास सुपर किंग्जचे प्रशिक्षक असतील. फ्लेमिंग हे एसए टी-२० मध्ये जोहानबर्ग सुपर किंग्जचे प्रशिक्षकही होते. त्याच वेळी, टेक्सास संघाने आणखी स्टार खेळाडूंना संघाचा भाग बनवले आहे.

**संघ** : रस्टी थेरॉन, लाहिरू मिलनताहा, सामी अस्लम, कोडी चेट्टी, सैतेजा मुकामल्ला, केल्विन सॅवेज, मिलिंद कुमार, कॅमेरून स्टीव्हनसन, झिया शहजाद, डेव्हॉन कॉनवे, अंबाती रायडू, डेव्हिड मिलर, जेराल्ड कोएत्झी, ड्वेन ब्राव्हो, डॅनियल सॅम्स, मिचेल सँटनर.

# नेदरलँड्‌सवर मात करून क्रोएशिया फायनलमध्ये

**नेशन्स लीग फुटबॉल**

**रॉटरडॅम : वृत्तसंस्था**

कर्णधार आणि अनुभवी मध्यरक्षक लुका मॉड्रिचने अतिरिक्त वेळेत पेनल्टीवर केलेल्या गोलच्या बळावर क्रोएशियाने नेदरलँड्‌सचा ४-२ असा पराभव करताना नेशन्स लीग फुटबॉलची अंतिम फेरी गाठली. या लढतीत ३७ वर्षीय मॉड्रिचची कामगिरी क्रोएशियासाठी निर्णायक ठरली. देशासाठी १६५वा सामना खेळणाऱ्या मॉड्रिचने एक गोल आणि एक गोलसाहाय्य केले.



नेदरलँड्स आणि क्रोएशिया यांच्यातील सामना चुरशीचा झाला. ३४व्या मिनिटाला डॉनयेल मालेनने केलेल्या गोलमुळे नेदरलँड्सने आघाडी मिळवली, मात्र उत्तरार्धात आंद्रे क्रॅमरिच (५५व्या मिनिटाला) आणि मारियो पासालिच (७२व्या मि.) यांनी गोल करत क्रोएशियाला २-१ अशी आघाडी मिळवून दिली. क्रोएशियाचा संघ नियमित वेळेतच सामना जिंकणार असे वाटत असतानाच ९० मिनिटांनंतरच्या भरपाई वेळेत नोआ लॅन्गने गोल करीत नेदरलँड्सला २-२ अशी बरोबरी करून दिली. त्यामुळे ३० मिनिटांचा अतिरिक्त वेळेचा खेळ झाला. यात ९८व्या मिनिटाला ब्रुनो पेट्कोविच, तर ११६व्या मिनिटाला मॉड्रिचने गोल नोंदवत क्रोएशियाला विजय मिळवून दिला.

मॉड्रिचच्या नेतृत्वाखालील क्रोएशिया संघाने २०१८च्या विश्वचषकात उपविजेतेपद पटकावले होते, तर गतवर्षी कतार येथे झालेल्या विश्वचषकात तिसरे स्थान मिळवले होते. आता मॉड्रिच आणि क्रोएशियाला नेशन्स लीगच्या जेतेपदाची संधी आहे.

# इशान किशनची दुलिप ट्रॉफीतून माघार

## कसोटी क्रिकेट भवितव्यावर परिणाम होण्याची शक्यता

**मुंबई : प्रतिनिधी**

वेस्ट इंडिज दौऱ्यापूर्वी होणाऱ्या दुलिप ट्रॉफीत खेळण्यास इशान किशन नकार दिला आहे. त्याच्या या निर्णयामुळे कसोटी संघातील त्याचे भवितव्य अंधारमय झाले आहे आणि अशात केएस भरत यालाच संधी मिळण्याची शक्यता बळावली आहे.



भारतीय संघ आता वेस्ट इंडिज दौऱ्यापासून जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या नव्या पर्वाची सुरुवात करणार आहे. जुलै महिन्यापासून सुरू होणाऱ्या या दौऱ्यात भारतीय संघ दोन कसोटी, तीन वन डे आणि पाच ट्वेंटी-२० सामन्यांची मालिका खेळणार आहेत. या दौऱ्यापूर्वी भारताच्या काही युवा खेळाडूंचा सराव व्हावा यासाठी त्यांची निवड दुलिप ट्रॉफी स्पर्धेसाठी केली आहे. रिषभ पंतच्या दुखापतीमुळे कसोटी इशान किशन हा भारताचा पहिल्या पसंतीचा यष्टिरक्षक-फलंदाज आहे.

दुलिप ट्रॉफी स्पर्धेतील पूर्व विभाग संघाच्या कर्णधारपदाच्या शर्यतीत इशान किशन आघाडीवर होता. ही स्पर्धा २८ जून ते १६ जुलै या कालावधीत होणार आहे, पण आता अभिमन्यू इश्वरन नेतृत्व करणार आहे. पीटीआयने दिलेल्या वृत्तानुसार इशान किशनला पूर्व विभागाचे कर्णधारपद द्यावी अशी विचारणा केली गेली. त्यानुसार विभागीत निवड समिती प्रमुखांना इशानला कॉल केला, पण त्याने दुलिप ट्रॉफी खेळण्यात इच्छा दाखवली नाही. तो दुखापतग्रस्त आहे की आणखी काही कारण, हे आम्हाला सांगितले गेले नाही, पण त्याला खेळायचे नव्हते, असे सूत्रांनी सांगितले.

इशानच्या नकारानंतर वृद्धीमान साहाला विचारणा केली गेली, परंतु त्यानेही नकार दिला. जर माझी भारतीय संघात निवडच होणार नसेल, तर मी दुलिप ट्रॉफी खेळून युवा खेळाडूची जागा कशाला अडवू, असे उत्तर साहाने दिले.

# विराटची आणखी एक इन्स्टा स्टोरी

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय संघाला डब्ल्यूटीसी फायनल २०२३मध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध २०९ धावांनी पराभव स्वीकारावा लागला होता. या पराभवानंतर भारताचा स्टार फलंदाज विराट कोहलीने त्याच्या इन्स्टाग्रामवर एक स्टोरी केली, जी व्हायरल झाली होती. आता त्याने आणखी एक इन्स्टाग्राम स्टोरी शेअर केली आहे.

या वेळी कोहलीने इंग्रजी लेखक ‘ॲलन वॉट्स’चा एक कोट शेअर केला आहे. त्यामध्ये लिहिले आहे की, परिवर्तनातून बाहेर पडण्याचा एकमेव मार्ग म्हणजे त्यात बुडणे, त्याच्याबरोबर पुढे जाणे आणि नृत्यात सामील होणे. कोहलीने काही वेळापूर्वी ही स्टोरी शेअर केली आहे.

ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या कसोटी चॅम्पियनशिपच्या अंतिम सामन्यात पराभूत झाल्यानंतर विराटने त्याच्या इन्स्टाग्राम स्टोरीद्वारे एक कोट शेअर केला होता, ज्यामध्ये असे लिहिले की, शांतता हा महान शक्तीचा एक अद्‌भूत स्रोत आहे.












दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com